# चंद्रपूर महासागर

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ४६ * अंक ४१ * * चंद्रपूर * | सोमवार, दिनांक ११ ऑगस्ट २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## केंद्रीयमंत्री गोपी यांच्याविरुद्ध तक्रार दाखल

■ वृत्तसंस्था, तिरुवनंतपुरम, दि. १० :

केंद्रीय मंत्री आणि त्रिशूरचे खासदार सुरेश गोपी त्यांच्या संसदीय मतदारसंघातून बेपत्ता झाल्याबद्दल केरळ विद्यार्थी संघटनेने (केएसयू) रविवारी त्रिशूर पूर्व पोलिसांकडे तक्रार दाखल केली. केएसयू जिल्हाध्यक्ष गोकुळ गुरुवायूर यांच्या मते, छत्तीसगडमध्ये केरळच्या दोन नन्सना अटक झाल्यापासून सुरेश गोपी या परिसरात दिसले नाहीत.गोपी कोणत्याही स्थानिक कार्यक्रमांना उपस्थित राहिलेले नाहीत. केएसयूने मंत्र्यांविरुद्ध मोहीम सुरू करण्याची धमकी दिली आहे आणि त्यांच्या अनुपस्थितीची चौकशी करण्याची मागणी केली आहे. मतदार यादीतील अनियमितता यासारख्या मुद्द्यांवरही मंत्री मौन बाळगून असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

अग्राग्रलेख

खरीखरी..

## २५ टक्के भुर्दंडाचे गूढ

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना आम्ही तुघलक म्हणतो. त्यांनी भारतावर पुन्हा हल्ला केलेला आहे. आपण रशियाकडून क्रूड ऑइल खरेदी करतो हा आपला घनघोर अपराध आहे असा त्यांचा दाव आहे आणि त्यांच्या मताप्रमाणे तो खराही असेल. कारण त्यांच्याच मताप्रमाणे भारत आणि पाकिस्तान युद्ध आपणच थांबवले असा दावा त्यांनी जवळजवळ तीन डझन पेक्षा जास्त वेळा केला. आता रशियाकडून जे क्रूड ऑइल आपण खरेदी करतो ते म्हणजे युद्धखोर रशियाला आपण मदत करतो, असा त्यांचा आरोप असून त्यावर आपण २५% पेनल्टी लावल्याचा त्यांचा दावा आहे. हा डोनाल्ड ट्रम्प नावाचा प्राणी कसाही असेल तरी रशियातून क्रूड ऑइल खरेदी करण्याच्या भारतीय धोरणाचा भारताला कितपत फायदा होतो, याचा विचार आपण आता करूया. म्हणजेच ट्रम्प यांच्या २५% कर वाढीचा फटका देशातील अनेक निर्यातदारांना बसणार आहे त्यामुळे त्यांच्यावर कठीण प्रसंगही येणार आहे. हजारो कर्मचारी यामध्ये बेकार होऊ शकतात. आपले पंतप्रधान म्हणतात की आपल्या देशातील जनतेच्या हिताकरिता मी आपला वैयक्तिक तोटाही सहन करू शकतो हा वैयक्तिक तोटा म्हणजे काय याचाही खुलासा झाला पाहिजे. २५ फेब्रुवारी २०२२ पासून रशिया आणि युक्रेनचे जे युद्ध सुरू झालेय ते अजूनही सुरू आहे. युद्ध सुरू होण्यापूर्वी जगामध्ये ज्या तेलाच्या किमती आहेत त्याच किमतीमध्ये आपण रशियाकडून क्रूड ऑइल ची आयात करत होतो. आपल्या एकूण आयातीच्या ०.२२% इतकी आपली रशियाकडून ची आयात होती. त्यानंतर रशियाने २० ते ३० टक्के कमी दरामध्ये आयात करण्याची सूटयुक्त सोयी सुविधा आपल्याला दिली. रशियाला लढाईसाठी निधी हवा होता म्हणून कदाचित अशी सवलत त्यांनी दिली असावी. तोपर्यंत आपण तेलसमृद्ध मुस्लिम राष्ट्रांकडून मोठ्या प्रमाणावर तेल खरेदी करत होतो. आता या खरेदीची गंमत बघा, आपल्या सरकारच्या तीन कंपन्या आहेत. त्यामध्ये एक इंडियन ऑईल कॉर्पोरेशन आहे, दुसरी बीपीसीएल आहे आणि तिसरी अजून एक महत्त्वाची कंपनी आहे, त्यासह अजूनही एक कंपनी हे काम करते असे सांगण्यात येते. या कंपन्या एकूण आयातीच्या फक्त २५% क्रूड ऑइल आयात करत होत्या. यांच्यापैकी ७५ टक्के क्रूड ऑइल रशियाकडून आयात करण्यामध्ये ज्या दोन कंपन्या महत्त्वाच्या होत्या. त्यापैकी एक नायरा आहे आणि दुसरी रिलायन्स आहे. या दोन गुजराती कंपन्यांनी ७५ टक्के क्रूड ऑइल खरेदी केले आणि ते रिफाइंड करून युरोपियन कंपन्यांना आणि देशांना पुरवले. काही दिवसांपूर्वी अमेरिकेने नायरावर बंदी घातली कारण त्यात काही रशियन संचालक सामील होते. अंबानीच्या रिलायन्सला अगदी आत्ता आतापर्यंत मुक्तद्वार होते. आताची परिस्थिती काहीही असले तरीही यापूर्वी केवळ अंबानीच्या कंपनींना या निर्यातीतून सहाशे अब्ज रुपयांचा फायदा झाला आहे. दुसऱ्या गुजराती कंपनीचा आमच्याकडे तपशीलवार आकडा नाही. म्हणजेच दोन गुजराती कंपन्यांसाठी आपल्या संपूर्ण देशावर २५% कर दंड आकारण्यात आला आहे. आता गुजरात सुद्धा आपल्या देशातच आहे. या चार गुजराती कंपन्यांची भरभराट म्हणजे देशाची भरभराट समजावी आणि आपण आनंदित राहावे. कारण बिचाऱ्या असलेल्या या तीन सरकारी कंपन्यानी देशातील अतिश्रीमंत, श्रीमंत मध्यमवर्गीय किंवा सामान्य अशा कोणत्याही वर्गाला एका पैशाचाही फायदा दिलेला नाही म्हणजेच त्यांनी फक्त आपला आणि आपलाच नफा वाढवलेला आहे. आम्ही वर म्हटल्याप्रमाणे यामुळे भविष्यात किती कंपन्यांचे बारा वाजतील याचा अंदाज आत्ताच न केलेला बरा, अशी रशियाच्या क्रूड ऑइलच्या गुढ आयातीची क्रूड कथा आहे. जय गुजरात! जय भारत!!


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# नागपूर-पुणे वंदे भारतचे

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते शुभारंभ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज ऑनलाईनच्या माध्यमातून नागपूर- पुणे वंदे भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवला आहे. यासोबतच महाराष्ट्राला देशातील सर्वात लांब पल्ल्याची वंदे भारत एक्सप्रेस मिळाली आहे. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी नागपूर येथे या वंदे भारत एक्सप्रेसची पाहणी केली. एक्सप्रेसच्या उद्धाटनाला नागरिक देखील मोठ्या संख्येने पोहोचले होते. या गाडीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे नागपूर ते पुणे हा १६ तासांचा प्रवास आता केवळ १२ तासांत पूर्ण होणार आहे.

नागपूर- पुणे मार्गावरील वंदे भारत एक्सप्रेसची मागणी अनेक महिन्यांपासून सुरू होती. अखेर ही मागणी पूर्ण झाल्याने नागपूरकरांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बंगळुरू रेल्वे स्थानकावरून अजनी (नागपूर)-पुणे वंदे भारत एक्सप्रेसला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या मार्फत हिरवा झेंडा दाखवला. यासोबतच केएसआर बंगळुरू- बेळगाव आणि श्री माता वैष्णोदेवी कटरा-अमृतसर या वंदे भारत एक्सप्रेसचा देखील शुभारंभ केला. यावेळी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि इतर मान्यवर उपस्थित होते. तर नागपूर रेलवे स्थानकावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज आपल्या सर्वांसाठी खूप आनंदाची गोष्ट आहे की नागपूर ते पुणे वंदे भारत ट्रेन सुरू झाली आहे. आम्ही रेल्वेमंत्र्यांकडे मागणी केली होती आणि त्यांनी सकारात्मक निर्णय घेतला जाईल असे सांगितले होते. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या रेल्वेला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. या ट्रेनची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आतापर्यंत सुरू झालेल्या सर्व वंदे भारत ट्रेनमध्ये ही सर्वात लांब पल्ल्याची ट्रेन आहे. ही ट्रेन १२ तासांत ८८१ किमी अंतर कापेल आणि सर्व प्रमुख स्थानकांवर थांबेल. यामुळे विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील लोकांसाठी मोठ्या प्रमाणात कनेक्टिव्हिटी वाढेल, असेही फडणवीस म्हणाले.

ही ट्रेन अहिल्यानगर ते दौंड आणि नंतर पुण्याला जावी अशीही आमची मागणी आहे. मार्ग बदलल्यामुळे अंतर १०० किलोमीटरपेक्षा जास्त वाढते.

त्यामुळे अहिल्यानगर ते पुणे असा थेट मार्ग बनवावा, ज्याचा फायदा एमआयडीसीलाही होईल. याव्यतिरिक्त, आम्ही असेही सुचवले आहे की जर आपण संभाजीनगर-अहिल्यानगर-पुणे मार्गावर बांधल्या जाणाऱ्या नवीन एक्सप्रेसवेला अतिरिक्त अधिकार देऊन रेल्वेशी जुळवून घेऊ शकलो तर हे काम वेगवान होईल. रेल्वे प्रवास जलद होईल आणि आम्ही वेळ एक तासाने कमी करू शकू, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

सध्या, भारतात २४ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये १४४ सेवांद्वारे ७२ वंदे भारत गाड्या धावत आहेत. येत्या ३ वर्षांत २०० हून अधिक वंदे भारत गाड्या सुरू करण्याची रेल्वेची योजना आहे. पुणे-अजनी वंदे भारत एक्सप्रेस सुरू केल्याने विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्यात जलद कनेक्टिव्हिटी स्थापित होईल. यामुळे प्रवाशांची सोय तर होईलच, शिवाय प्रादेशिक व्यापार, पर्यटन आणि एकूणच आर्थिक विकासालाही बळकटी मिळेल.




### वंदे भारतला थांबे किती?

ट्रेन २६१०१ पुणे-अजनी वंदे भारत एक्सप्रेस आठवड्यातून ६ दिवस (मंगळवार वगळता) सकाळी ६.२५ वाजता पुण्याहून सुटेल आणि त्याच दिवशी सायंकाळी ६.२५ वाजता अजनी (नागपूर) येथे पोहोचेल. ट्रेन २६१०२ अजनी-पुणे वंदे भारत एक्सप्रेस आठवड्यातून ६ दिवस (सोमवार वगळता) सकाळी ९.५० वाजता अजनीहून सुटेल आणि रात्री ९.५० वाजता पुण्याला पोहोचेल. ही ट्रेन वर्धा, बडनेरा, अकोला, शेगाव, भुसावळ, जळगाव, मनमाड, कोपरगाव, अहमदनगर आणि दौंड कॉर्डलाइन स्थानकांवर थांबेल. या ट्रेनमध्ये एकूण ८ कोच असतील ज्यामध्ये १ एक्झिक्युटिव्ह चेअर कार (EC) आणि ७ चेअर कार (CC) असतील. यात 590 प्रवाशांची बसण्याची क्षमता आहे. ज्यामध्ये ४४ सीट ईसी आणि ५४६ सीट सीसी कोचमध्ये उपलब्ध आहेत.

## भारत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर

■ वृत्तसंस्था, बंगळुरू, दि. १० :



मोदींचे ट्रम्प यांच्या मृत अर्थव्यवस्थेच्या विधानाला उत्तर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे नाव न घेता त्यांना उत्तर दिले. मोदींनी बंगळुरूमध्ये म्हटले- भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. आपण १० व्या क्रमांकावरून पहिल्या ५ व्या क्रमांकावर आलो आहोत. लवकरच पहिल्या ३ मध्ये येऊ. ही ताकद सुधारणा, कामगिरी आणि परिवर्तनातून आली आहे. देशाच्या कामगिरीचा झेंडा आकाशात उंच फडकत आहे.

याशिवाय, ऑपरेशन सिंदूरबद्दल पंतप्रधान मोदी म्हणाले- भारतीय सैनिकांची दहशतवाद्यांना आणि पाकिस्तानला गुडघे टेकण्याची क्षमता संपूर्ण जगाने पाहिली आहे. त्याच्या यशामागे आपल्या तंत्रज्ञानाची आणि मेक इन इंडियाची शक्ती आहे. बंगळुरूच्या तरुणांनीही यात मोठे योगदान दिले आहे. पंतप्रधान आज कर्नाटक दौऱ्यावर आहेत. यादरम्यान त्यांनी बंगळुरूमधील केएसआर रेल्वे स्थानकावर ३ वंदे भारत एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. यामध्ये बंगळुरू ते बेळगाव, अमृतसर ते श्री माता वैष्णोदेवी कटरा आणि नागपूर (अजनी) ते पुणे या गाड्यांचा समावेश आहे.

यलो मेट्रो लाईनच्या आगमनाने लाखो लोकांना फायदा होईल. आज ऑरेंज लाईनचा पायाभरणी समारंभही झाला. त्याच्या उद्घाटनानंतर, यलो आणि ऑरेंज मेट्रो लाईन्सचा २५ लाख लोकांना फायदा होईल. इन्फोसिससह अनेक मोठ्या कंपन्यांनी बंगळुरू मेट्रोला निधी दिला. भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. आपण १० व्या क्रमांकावरून पहिल्या ५ मध्ये पोहोचलो आहोत. लवकरच आपण पहिल्या ३ मध्ये येऊ. ही ताकद सुधारणा, कामगिरी आणि परिवर्तनातून आली आहे. देशाच्या कामगिरीचा झेंडा आकाशात उंच फडकत आहे. २०१४ पूर्वी ७४ विमानतळ होते आणि त्यांची संख्या १६० पेक्षा जास्त आहे. फक्त ३ राष्ट्रीय जलमार्ग होते, आता ही संख्या ३० झाली आहे. ११ वर्षांपूर्वी ७ एम्स होते, आता २२ एम्स आणि ७०० वैद्यकीय महाविद्यालये आहेत. २०१४ पूर्वी भारताची एकूण निर्यात ४६८ अब्ज डॉलर्स होती. आज ती ८२४ अब्ज डॉलर्स आहे.

भारत जागतिक एआयच्या दिशेने पुढे जात आहे. सेमीकंडक्टर मिशनला गती मिळत आहे. मेड इन इंडिया चिप्स लवकरच उपलब्ध होतील. भविष्याशी संबंधित तंत्रज्ञानात भारत पुढे जात आहे.

## बेस्ट सोसायटी निवडणुकीत ठाकरे बंधू एकत्र मैदानात

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १० :



काँग्रेसचे दिल्लीश्वर राहुल गांधी यांनी हिरवा कंदील दाखवल्यावर उद्धव आणि राज ठाकरे एकत्र येण्याच्या प्रक्रियेला आणखी गती मिळाली आहे. ठाकरे बंधू मुंबई मनपा निवडणूक एकत्र लढतील, असे जवळपास निश्चित झाले आहे.

त्याची रंगीत तालीम १८ ऑगस्टला बेस्ट एम्प्लॉइज को-ऑप क्रेडिट सोसायटी निवडणुकीत होईल. सोसायटीत लढण्यासाठी मनसे-उद्धवसेनेने एकत्रितपणे उत्कर्ष पॅनल तयार केले आहे. १९ जागा उद्धवसेनेची कामगार सेना तर २ जागा मनसे लढेल. उत्कर्षची प्रमुख लढत सहकार समृद्धी पॅनलशी होईल.

हे पॅनल भाजप आमदार प्रवीण दरेकर, प्रसाद लाड यांची श्रमिक उत्कर्ष सभा, मंत्री नितेश राणेंची समर्थ बेस्ट कामगार, शिंदेसेनेच्या किरण पावसकरांची राष्ट्रीय कर्मचारी सेना, महेंद्र साळवेंची बेस्ट एसी/एसटी/ व्हीजेएनटी वेल्फेअर असोसिएशन, मनोज संसारेंच्या यांचा बहुजन संघाने तयार केले आहे.

## जुन्या वैमनस्यातून दोघांचा खून

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. १० :



### दुहेरी हत्याकांड प्रकरणात ४ आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

भंडारा शहरात शनिवारी रात्री दुहेरी हत्याकांडाची घटना घडली आहे. रात्री उशिरा दुकानात बसलेल्या एका तरुणावर काही जणांनी धारदार शस्त्राने हल्ला केला. यावेळी मध्यस्थी करायला आलेल्या दुसऱ्या तरुणावर देखील आरोपींनी वार केले. हा हल्ला इतका भयंकर होता की, हल्लयात दोघांचाही दुर्दैवी अंत झाला. या प्रकरणी पोलिसांनी चार जणांना अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जुन्या वैमनस्यातून दोघांचा खून केल्या गेल्याची घटना शनिवार, ९ ऑगस्ट रोजी रात्री साडे नऊ वाजताच्या दरम्यान भंडारा येथील गजबजलेल्या मिस्कीन टैंक परिसरात घडली होती. या घटनेत टिंकू उर्फ वसीम खान (३५) आणि शशांक गजभिये (२२) या दोघांचा कुऱ्हाड आणि चाकूचे घाव घालून खून करण्यात आला. या प्रकरणात पोलिसांनी रात्रीच फैजान शाकीर शेख (२४), साहिल शाकीर शेख (२२), आयुष मुन्ना दहिवले (१९, तिघेही रा. भंडारा) व प्रीतम विलास मेश्राम (३३, रा. शहापूर) या चार आरोपींना अटक केली आहे.

फिर्यादी मोहम्मद यासिन शेख ( २९,रा. अशरफी नगर, तकिया वार्ड, भंडारा) यांच्या तोंडी तक्रारीवरून आरोपी यांनी मृतक हे फिर्यादीचे दुकानात बसले असता, लहान कुऱ्हाड व चाकू घेवून टिंकू याचे मागे धावून गेले. मृतक टिंकूला जमिनीवर पाडून कुऱ्हाड व चाकूने मारत असताना शिवीगाळ करीत होते. साहील व फैजान शेख से दुश्मनी करोगे तो जान से जाओगे. कुत्ते की तरह दौडा-दौडाकर मारेंगे असे जोरात बोलत आरोपी साहिलने लहान कुऱ्हाडीने आणि फैजान व त्याच्या साथीदारांनी चाकूने टिंकूच्या शरीरावर वार केले. दरम्यान, टिंकू याला वाचवण्याकरता शशांक गजभिये हा गेला असता, तेव्हा चारही आरोपींनी शशांकलाही चाकू व कुऱ्हाडीने मारुन खाली पाडले.

विशेष म्हणजे, चारही आरोपींनी अत्यंत निर्दयपणे दोघांवरही घाव घातले. ते निपचित पडल्यानंतर आरोपी घटना स्थळवरून पसार झाले. काही वेळेपर्यंत ते दोघेही तसेच पडून होते. काही नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून दोघांनाही रुग्णालयात पाठविले. दरम्यान वसीम खान व शशांक गजभिये यांचे मरणास कारणीभुत झाले असल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अभिप्रायवरुन चारही आरोपींविरुद्ध अपराध क्र. १०७०/२०२५ कलम १०३ (१), ३५२, ३(५) भा.न्या.सं. सहकलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## उत्तर प्रदेशात मुसळधार पाऊस

### अयोध्या-लखनऊ महामार्गावरील ओव्हरब्रिज कोसळला

■ वृत्तसंस्था,लखनऊ, दि. १० :

उत्तर प्रदेशात सततच्या पावसामुळे नद्या आणि नाले तुडुंब भरून वाहत आहेत. अयोध्येतील लखनऊ महामार्गावरील ओव्हर ब्रिजचा रस्ता पावसामुळे कोसळला. हा ओव्हरब्रिज ६ महिन्यांपूर्वी १५० कोटी रुपये खर्चून बांधण्यात आला होता. पूरमध्ये, पावसात आंघोळ करणाऱ्या एका मुलावर अचानक वीज पडली. त्यात मुलाचा जागीच मृत्यू झाला. त्याच वेळी, फारुखाबादमधील ४० गावे गंगा नदीच्या पुराच्या विळख्यात सापडली आहेत. शाहजहांपूर आणि शमशाबाद रस्त्यावर २ फूट पाणी आहे.

## देशातील टॉप महागड्या शहरांमध्ये मुंबई नंबर १

■ वृत्तसंस्था, लखनऊ, दि. १० :

२०२५ मध्ये नवीन सर्कल रेट लागू झाल्यानंतर, देशातील टॉप १० महागड्या शहरांपैकी मुंबई हे पहिल्या क्रमांकावर आहे.

त्यानंतर दिल्ली दुसऱ्या क्रमांकावर, तर चंदीगड हे तिसऱ्या क्रमांकावर आहे. सध्या नोएडा हे उत्तर प्रदेशातील सर्वात महागडे शहर झाले आहे. सध्या १ ऑगस्टपासून नवीन सर्कल दर लागू झाले आहेत.

यूपीचा विचार केला तर, लखनौ हे देशातील टॉप १० महागड्या शहरांपैकी एक बनले आहे. यासह, ते उत्तर प्रदेशातील महागड्या जमिनीच्या बाबतीत तिसरे शहर बनले आहे.

## गरुड दृष्टी प्रणालीमुळे गुन्हेगारी हालचाली टिपणे शक्य

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर , दि. १० :



### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास

या जगात कुठलीही गोष्ट मोफत मिळत नाही, की कोणाला घरबसल्या लॉटरी लागत नाही. त्यामुळे समाज माध्यमांवरून प्रसारित होणाऱ्या प्रलोभनांना, अफवांना नागरिकांनी बळी पडू नये, यासाठी नागपूर पोलिसांनी गरूड दृष्टी या प्रकल्पातून मोठे यश मिळवले आहे. त्याचे पेटंट गृह विभागाकडे आहे. नागपूरचा हा पथदर्शी प्रकल्प राज्यातल्या इतरही जिल्ह्यांत राबविला जाईल, असे संकेत मुख्यमंत्री आणि राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे दिले.

नागपूर पोलिसांनी विकसित केलेल्या गरुड दृष्टी या सोशल मीडिया मॉनिटरिंग साधन सादरीकरणाचे अवलोकन आणि सायबर फसवणूकीत बळी पडलेल्या नागरिकाना १० कोटी रुपयांच्या परतफेडीची रक्कम मुख्यमंत्री फडणवीस यांच्याहस्ते सुपूर्द करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र कुमार सिंगल, सह पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, अतिरिक्त पोलिस आयुक्त (गुन्हे) वसंत परदेसी, राजेंद्र दाभाडे प्रामुख्याने उपस्थित होते.

समाज माध्यमे ही आधुनिक युगातल्या अभिव्यक्तीचे माध्यम असले तरी हे अनियंत्रित हत्यार बनत आहे, असे सुरुवातीलाच नमूद करीत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, समाज माध्यमांवरून द्वेश, अफवा पसरवणे, समाजात तेढ निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्था धोक्यात आणणे, अंमली पदार्थांची बाजारपेठ सारख्या गुन्हेगारीकरणासाठी त्याचा गैरवापर होत आहे. समाज माध्यमांचे आका परदेशात बसतात. त्यामुळे त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा नाही. मात्र गरुड दृष्टीतून अफवांना आवर घालून समाजमाध्यमांचा गैर वापर करणाऱ्यांना शोधता येते. त्यामुळे राज्यातील इतर जिल्ह्यांसह इतर विभागांमध्येही गरूड दृष्टी या पथदर्शी प्रकल्पाचा विस्तार केला जाईल, असेही ते म्हणाले.

आरोग्यासाठी जसा गोल्डन अवर महत्वाचा असतो, तसेच सायबर, ऑनलाईन फसवणूकीतही गोल्डन अवर महत्त्वाचा ठरतो, असे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सायबर शाखेकडे लगेच दाद मागितली तर झालेल्या व्यवहारानंतर बँक खाते गोठवता येते. मात्र तक्रार करण्यास विलंब झाला तर सायबर गुन्हेगारांना बनावट बँक खात्यात पैसे वळती करून घेण्यास रोखता येते. या जगाच्या पाठीवर कोणतीही गोष्ट मोफत मिळत नाही, असे ठामपणे नमूद करीत मुख्यमंत्री फडणवसी म्हणाले, न काढलेल्या लॉटरीचे बक्षिस कसे लागेल, हा प्रश्न आधी प्रत्येकाने स्वतःला विचारला पाहिजे. प्रलोभनांना बळी न पडता बुद्धीचे डोळे उघडले तर सायबर फसवणूक टाळता येते.




# राज्यात पाऊस पुन्हा सक्रिय

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १० :

मागील दोन तीन दिवसांपासून राज्यात पुन्हा पावसाने हजेरी लावली असून आजपासून पावसाचा जोर वाढणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. त्यानुसार आज मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात विजांसह पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

जुलै महिन्यातील तीन चार दिवस वगळता फारसा पाऊस पडलेला नाही. त्यामुळे जुलै महिन्यात सामान्य पावसाची नोंद झाली. त्यानंतर ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यातही पावसाचा जोर नव्हता. मागील दोन तीन दिवसांपासून राज्यात पुन्हा पाऊस सक्रिय झाला आहे. मुंबईसह इतर भागात पाऊस पडत आहे.

मॉन्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा ईशान्य बंगालच्या उपसागरापर्यंत सक्रिय आहे. पश्चिम उत्तर प्रदेश आणि परिसरावर समुद्र सपाटीपासून ३.१ किलोमीटर उंचीवर चक्राकार वारे वाहत आहेत. त्यापासून झारखंडपर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. तसेच कर्नाटक आणि परिसरावर समुद्र सपाटीपासून ५.८ किलोमीटर उंचीवर चक्राकार वारे कायम आहे. बंगालच्या उपसागरात बुधवारपर्यंत हवेचे कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याचे संकेत आहेत.

मुंबईत मोसमी पाऊस येत्या आठवड्यात म्हणजेच उद्यापासून पुन्हा सक्रिय होणार असल्याचा अंदाज आहे.



त्यामुळे उद्यापासून मुंबईत पावसाचे प्रमाण तुलनेने अधिक राहील. त्याचबरोबर पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रात सोमवारपासून पाऊस पडण्यास सुरुवात होईल.

वातावरणीय परिस्थितीनुसार, तामिळनाडू किनाऱ्याजवळ वरच्या हवेतील चक्राकार वारे तयार होतील. ही विकसित होणारी प्रणाली पश्चिमेकडील मोसमी वाऱ्यांना कमकुवत करेल आणि पूर्वेकडून वारे वाहण्यास सुरुवात होईल ज्यामुळे महाराष्ट्राच्या हवामानावर परिणाम होईल, असा अंदाज खासगी हवामान अभ्यासकांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे मराठवाडा आणि अंतर्गत महाराष्ट्रात, विशेषतः दुष्काळग्रस्त भागात, वादळाचा धोका वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, विदर्भ, मराठवाडा आणि बारामतीजवळील पुणे जिल्ह्याच्या पूर्वेकडील भागात मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. या काळात पुणे शहरात एक किंवा दोन दिवस वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# पुणे जिल्ह्यात १०८३ मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पांचे काम सुरु

## पूर्ण न केल्यास कंपन्यांना ५ वर्षांसाठी काळ्या यादीत टाकण्याचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. १० :



पुणे जिल्ह्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2.0 अंतर्गत 1083 मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पांचे काम सुरु आहे. या प्रकल्पांसाठी 7 कंपन्या कार्यरत आहेत. ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी या कंपन्यांना कामाचा वेग वाढवून प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. अन्यथा त्यांना पुढील 5 वर्षांसाठी काळ्या यादीत टाकण्याचा इशारा दिला आहे.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित 'टास्क फोर्स'च्या बैठकीत शुक्ला यांनी ही माहिती दिली. राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात ही योजना राबवली जात आहे. या योजनेतून राज्यात 16 हजार मेगावॅट वीज निर्मिती अपेक्षित आहे. पुणे जिल्ह्यात 131 वीज उपकेंद्रांतर्गत 1083 मेगावॅट वीज निर्माण होणार आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हापातळीवर 'टास्क फोर्स'ची स्थापना करण्यात आली आहे. या बैठकीला महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी, महावितरणचे संचालक योगेश गडकरी, राजेंद्र पवार आणि प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

दीड वर्षापूर्वी 7 कंपन्यांना 1083 मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पांचे कार्यादेश देण्यात आले होते. यातील आवादा कंपनीने 36 मेगावॅटचे प्रकल्प पूर्ण केले आहेत. अनेक कंपन्यांचे प्रकल्प पूर्णत्वाच्या मार्गावर असून सप्टेंबर 2025 पर्यंत बरेच प्रकल्प पूर्ण होतील. मात्र काही कंपन्यांचे काम अत्यंत संथ गतीने सुरु असल्याने त्यांनी कामाची गती वाढवावी असे आवाहन शुक्ला यांनी केले. महावितरणच्या उपविभागीय अभियंत्यांना या योजनेसाठी नोडल अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. त्यांनी प्रकल्पांना लागणाऱ्या जागा ताब्यात देण्यासाठी समन्वय साधून अडचणी दूर करण्याचे काम करावे. तसेच महसूल, पोलीस, वन विभाग, सार्वजनिक बांधकाम आदी विभागांनीही या कामातील अडचणी दूर कराव्यात अशा सूचना शुक्ला यांनी संबंधितांना दिल्या.

# निवडणूक आयोगाचे काम भाजप ऑफिसमधून : आदित्य ठाकरे

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १० :



आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल (व्हीव्हीपॅट) मशीनचा वापर न करण्याच्या निवडणूक आयोगाच्या भूमिकेवरून राजकीय वातावरण तापले आहे. या पार्श्वभूमीवर उबाठा नेते आदित्य ठाकरे यांनी थेट निवडणूक आयोगावरच हल्ला चढवला. निवडणूक आयोग हा भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयातून चालतो.

ठाकरेंच्या या भूमिकेला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते बाळा नांदगावकर यांनीही बळ दिले आहे. व्हीव्हीपॅटशिवाय निवडणुका पारदर्शक असूच शकत नाहीत, असे ठामपणे सांगत नांदगावकर यांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयाचा निषेध केला आहे. तीन वर्षांपासून प्रशासकांच्या ताब्यात असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅट वापरले नाही, तर तो जनतेच्या लोकशाहीवरील विश्वासाला धक्का असेल असा इशाराही त्यांनी दिला.

मनसे, उबाठा, काँग्रेस आणि आम आदमी पार्टी या सर्व विरोधी पक्षांनी व्हीव्हीपॅटच्या वापरासाठी जोरदार मागणी केली आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर सत्ताधाऱ्यांचा दबाव असल्याचा आरोप आता विरोधक एकत्रितपणे करत आहेत. व्हीव्हीपॅटशिवाय निवडणुका घेतल्यास हा वाद न्यायालयातही जाण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी केलेल्या खुलाशामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असतानाच आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी पवारांवर जोरदार हल्लाबोल केला आहे. म्हस्के यांनी पवारांच्या वक्तव्यांची तुलना कपिल शर्मा कॉमेडी शोशी करत त्यांच्यावर टीका केली. पवार साहेब मोठे नेते आहेत, पण त्यांच्या वक्तव्यांवर प्रतिक्रिया देताना संयम बाळगावा लागतो, असा टोला त्यांनी लगावला. १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटांचा संदर्भ देत म्हस्के यांनी पवारांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय योग्य वेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे प्रतिपादन



■ महासागर प्रतिनिधी
नारायणगाव, दि. १० :

केंद्रातील कृषिमंत्री मामा व राज्यातील कृषिमंत्री मी पण मामा, असे दोन्ही मामा मिळून शेतकऱ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचा विचार करू तसेच शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे योग्य वेळी घेतील, असे प्रतिपादन राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.

पुणे जिल्हा सहकारी बँकेच्या पिंपळवंडी शाखेचे नवीन जागी स्थलांतर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते पार पडले, त्या वेळी ते पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले, अनेकदा शेतकरी म्हणतात, शेती व्यवसाय परवडत नाही. परंतु, नियोजनबद्ध शेती केली तर शेतामधून चार पैसे मिळतात. निसगार्चा लहरीपणा शेतकऱ्याला अडचणीत आणतो, ही वस्तुस्थिती आहे. मात्र, भविष्यकाळात शेतकऱ्याला ऊर्जितावस्था निर्माण करून देण्यासाठी राज्य व केंद्र सरकारचा प्रयत्न राहील.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून या निवडणुका महायुती म्हणून लढवायच्या की स्वतंत्र लढवायच्या, याबाबतचा निर्णय आमचे वरिष्ठ घेतील, असे भरणे यांनी सांगितले. शेतकऱ्यांना कर्जमाफी कधी मिळणार? याबाबत विचारणा केली असता ते म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री पवार, शिंदे याबाबतचा निर्णय योग्य वेळी घेतील, असे सांगत त्यांनी याविषयी अधिक बोलण्याचे टाळले तसेच शेतकऱ्यांना खते घेताना इतर खतांची सक्ती केली जाते. यावर भरणे यांनी माहिती घेऊन योग्य निर्णय घेऊ, असे सांगितले. विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळाले असून, विरोधक आपला पराभव झाकण्यासाठी ईव्हीएम मशिनला दोष देत आहेत.

# नवीन महानगरपालिका, हद्दवाढ ३१ डिसेंबरपर्यंतच शक्य अजित पवारांच्या प्रस्तावावर मंजुरीची प्रतिक्षा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १० :



पुणे परिसरातील झपाट्याने झालेले नागरीकरण लक्षात घेता तीन महानगरपालिका स्थापन करण्याची योजना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडली असली तरी जनगणनेच्या प्रक्रियेमुळे नवीन महानगरपालिका वा हद्दवाढ ३१ डिसेंबरपूर्वी पूर्ण करावी, अन्यथा मार्च २०२७ पर्यंत काहीही बदल करता येणार नाहीत, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे.

पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिका सध्या अस्तित्वात आहेत. वाढते नागरीकरण लक्षात घेता पुणे परिसरात हिंजवडी, चाकण आणि उरुळी देवाची, फुरसुंगी, लोणी काळभोर आणि वाघोली या भागासाठी स्वतंत्र अशा तीन महानगरपालिका स्थापन करण्याची आवश्यकता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली. अर्थात, पवारांच्या या प्रस्तावाला शिवसेना शिंदे गट आणि भाजपचा पाठिंबा नाही. यामुळेच अजितदादांनी घोषणा केली त्याच दिवशी पुणे दौऱ्यावर असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीनऐवजी एक नवीन महानगरपालिका स्थापन करण्याचा विचार करता येईल, असे विधान करीत वेगळा सूर लावला. जनगणनेची प्रक्रिया एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या काळात राबविली जाणार आहे. २०२६ मध्ये घरांची नोंदणी, एकूण किती घरे आहेत, घरात फोन, इंटरनेट वगैरे माहिती गोळा केली जाईल. १ ते २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत प्रगणक प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहिती गोळा करतील. १ मार्च २०२७ या दिवशी १६व्या जनगणनेची प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

जनगणनेची ही सारी प्रक्रिया लक्षात घेता ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी नवीन महानगरपालिका, हद्दवाढ, जिल्हा किंवा तालुक्यांच्या सीमांमध्ये बदल करायचा असल्यास करावा, असा आदेशच ह्यरजिस्टर जनरल ऑफ इंडियाने सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना दिला आहे. १ जानेवारी २०२६ ते ३१ मार्च २०२७ या सव्वा वर्षाच्या कालावधीत जिल्हा, तालुका वा महानगरपालिकांच्या सीमांमध्ये बदल करता येणार नाही. यामुळेच अजित पवारांनी सुचविलेल्या तीन महानगरपालिकांची स्थापना डिसेंबरअखेरपर्यंत पूर्ण करावी लागेल अथवा २०२७ नंतरच त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी लागेल.

# विवाहितेचा राहत्या घरी गळफास

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १० :

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणाची धग अजून शांतही झाली नसताना, पुण्यात पुन्हा एकदा सासरच्या छळाला कंटाळून 25 वर्षीय विवाहितेने जीवन संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. स्नेहा विशाल झेंडगे असे मृत महिलेचे नाव असून, माहेरून 20 लाख घेऊन येण्याचा तगादा लावत तिचा शारीरिक व मानसिक छळ केला. या त्रासाला कंटाळून स्नेहाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना रविवारी उशिरा उघडकीस आली. या प्रकरणी स्नेहाच्या वडिलांनी, कैलास मच्छिंद्र सावंत यांनी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी सासरच्या सात जणांविरोधात गुन्हा नोंदवला आहे

मिळालेल्या माहितीनुसार, स्नेहाचा विवाह गेल्या वर्षी विशाल झेंडगे यांच्याशी झाला होता. विवाहानंतर ती पतीसोबत आंबेगाव पठार येथे राहत होती. परंतु, लग्नानंतरच्या काळात स्नेहा आणि सासरच्या मंडळींमध्ये वाद वाढले. पती, सासू, सासरे, दीर आणि नणंदीकडून तिच्यावर सतत शारीरिक व मानसिक छळ होत असल्याचा आरोप फियार्दी व स्नेहाचे नातेवाईक यांनी केला आहे.

स्वयंपाक नीट करता येत नाही, माहेरून वीस लाख रुपये आणावेत, अशा कारणांवरून स्नेहाचा वारंवार शारीरिक व मानसिक छळ केला जात होता. या सततच्या त्रासामुळे आणि आत्महत्येस प्रवृत्त केल्यामुळे अखेर स्नेहाने आयुष्य संपवण्याचा मार्ग निवडला आणि छळामुळे नैराश्यात गेलेल्या स्नेहाने अखेर राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली, असे तक्रारीत म्हटले आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. १० :

दिंडोरी शिवारातील बदादे वस्तीवर बिबट्याच्या हल्ल्यात एका शेतकरी महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. जनाबाई जगन बदादे वय 65 मयत शेतकरी महिलेचे नाव आहे. शेतात कामे करत असताना बिबट्याने महिलेवर हल्ला करून तिला उसात ओढून नेले.

दरम्यान, दिंडोरी शहरात बिबट्याच्या हल्ल्यात तिसरा बळी गेल्याने तीव्र संताप उसळला असून, मयत महिलेचे नातेवाईक ग्रामस्थांनी वन विभागाच्या कार्यालयासमोर मृतदेह आणत संताप व्यक्त केला. तसेच नाशिक कळवण रस्त्यावर मृतदेह ठेवत रास्ता रोको केला. पोलिस आणि नातेवाईक यांच्यात संघर्ष सुरु झाला. पोलिस निरीक्षक रघुनाथ शेगर यांनी नागरिकांची समजूत काढल्यानंतर रास्ता रोको मागे घेण्यात आला. सुमारे दीड तास रास्ता रोको सुरु असल्याने मोठी वाहतूक कोंडी झाली.

याबाबत अधिक माहिती अशी की, जनाबाई जगन बदादे (६५) असे बिबट्याच्या हल्ल्यात ठार झालेल्या महिलेच्या नाव आहे. आपल्या शेतातील घराजवळ शेतात कोथिंबीर काढणी करत असताना शेजारच्या उसाच्या शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने हल्ला केला व उसात ओढून नेले. आजीने हल्ला होताच आरडा ओरड केल्याने, त्यांचा मुलगा संजय व इतर नातेवाइकांनी धाव घेत बिबट्याला पिटाळून लावले.

# शरद पवारांचा दावा म्हणजे वरातीमागून घोडे

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १० :

शरद पवारांनी 160 जागांसंदर्भात केलेला दावा हा वराती पाठीमागून घोडे असल्यासारखे आहे. आम्ही यापूर्वी सगळ्या पक्षांना कोर्टात जाण्याचे आवाहन केले होते, पण तेव्हा कोणीही सोबत आले नाही. आता फक्त बोंबलत बसले आहेत. किती खोटे बोलावे, यालाही एक सीमा असते, अशी बोचरी टीका वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. तसेच त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मंडल यात्रेवर टीका करत गंभीर आरोप केले आहेत.

शरद पवारांच्या 160 जागांच्या दाव्यासंदर्भात बोलताना म्हणाले की, हा



प्रकाश आंबेडकरांची बोचरी टीका

दावा म्हणजे वरातीमागे घोडे अशी काँग्रेसची आणि राष्ट्रवादीची परिस्थिती आहे. ईव्हीएम संदर्भात कोर्टात जाण्यासाठी आपण यापूर्वी सर्व पक्षांना एकत्र येण्याचे आवाहन केले होते. त्यावेळी कोणीही आमच्यासोबत आले नाही. कोर्ट हे एकमेव व्यासपीठ आहे, जिथे दूध का दूध आणि पाणी का पाणी होते. आता बोंबलत बसण्याऐवजी त्यावेळीच पाऊल उचलणे गरजेचे होते.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, निवडणूक आयोगाच्या विरोधात कोर्टात जाण्यासाठी आपण पत्र लिहिले होते. पण त्यावेळी कोणीच सोबत उभा राहिला नाही. मुंबई उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली असली तरी आम्ही सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. तुमचा लढा खरा असेल आणि तुम्ही मोदींना घाबरत नसाल, तर तुम्ही यात सहभागी होऊ शकता, असे आवाहनही त्यांनी शरद पवारांना केले.

# शस्त्र तस्कर सलीम पिस्टलला नेपाळमध्ये अटक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :

कुख्यात शस्त्र तस्कर सलीम शेख उर्फ सलीम पिस्टल शस्त्रास्त्रांच्या तस्करी प्रकरणात दिल्ली पोलिसांच्या विशेष शाखा आणि भारतीय सुरक्षा यंत्रणेने नेपाळ मधून अटक केली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते आणि माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांच्या हत्या प्रकरणात शस्त्रे पुरविल्याचा सलीमवर संशय आहे.

माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची १२ ऑक्टोबर २०२४ रोजी वांद्रे येथे गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. लॉरेन्स बिष्णोई टोळीने ही हत्या घडवून आणली होती. याप्रकरणात आतापर्यंत २६ जणांना अटक करण्यात आली आहे. या हत्या प्रकरणातील आणखी एक संशयित सलीम शेख उर्फ सलीम पिस्टल सुरक्षा यंत्रणेच्या हाती लागला आहे.

# भाजपा मराठा नेते अन् अधिकाऱ्यांना संपवताहेत

■ महासागर प्रतिनिधी
अहिल्यानगर, दि. १० :

देवेंद्र फडणवीस जाणून बुजून मराठ्यांचे नेते संपवायला लागले आहेत. आमचा काही लॉस नाही पण सर्वच राजकीय पक्षातील नेत्यांनी सावध होणं गरजेचे आहे. मराठ्यांच्या अधिकाऱ्यांना सुद्धा त्रास होत आहे, मुद्दाम मराठा अधिकारी संपवण्याचा प्रयत्न फडणवीस यांच्याकडून करण्यात येत आहे, असा आरोप मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी अहिल्या नगरमध्ये बोलताना केला आहे.

मनोज जरांगे पाटील पुढे बोलताना म्हणाले की, सगळ्या मंत्र्यांना त्यांनी स्वतःचे एक-एक ओएस डी दिले आहेत. प्रत्येक खात्यामध्ये काय काम सुरू आहे त्यांची माहिती घेतली जात आहे. इतकं बे भरवश्याचे माणूस असतो का? ते तुमच्या पक्षात आले आहेत ना? तरी ओएस डी ठेवला आहे, यावरुन फडणवीस किती आतल्या गाठीचे आहे हे कळते.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, भाजप वेगळा पक्ष होती आणि आता यांनी वेगळाच करुन ठेवला आहे.सत्तेवर येण्यासाठी भाजपमध्ये कधीच येऊ न शकणाऱ्या नेत्यांनी त्यांनी



मनोज जरांगेंचा गंभीर आरोप

भाजपसोबत आणले. नारायण राणे, एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासारखे लोक तिकडे जाऊ शकत नाही पण देवेंद्र फडणवीसांनी त्यांना तिकडे नेले. अशोकराव चव्हाण सारखा मुख्यमंत्री राहिलेला माणूस तिकडे जाऊ शकत नाही, पण यांनी त्यांना भाजपमध्ये प्रवेश करायला लावला.

काँग्रेसमध्ये अनेक वर्षे काम केलेल्या नेत्यांनी काय केंद्रीय गृहमंत्री पाहिले नाही का? पाहिले ना शिवराज सिंह पाटील पाहिले, सुशीलकुमार शिंदे पाहिले. पण आता त्यांना भाजपमध्ये जावे लागलं ही दशा आहे मराठ्यांची. मीडियासमोर ते काही बोलणार नाही पण सर्वांना माहिती आहे की हा माणूस सर्वांना संपवतो आहे.

# जेडब्ल्यू कंपनीच्या विस्ताराने पेण तालुक्याचा कायापालट होणार पुन्हा हजारो स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार

■ महासागर प्रतिनिधी
पेण, दि. १० :



१९९१ साली निप्पॉन डेंड्रो या नावाने स्थापन झालेल्या कंपनीचा विस्तार आज महाकाय असा जे एस डब्ल्यू कंपनीमध्ये झालेला आहे. आज या कंपनीमध्ये हजारो कामगार कॉन्ट्रॅक्ट कंपनीच्या माध्यमातून काम करीत आहेत.

1991 साली स्थापन झालेले या कंपनीचा आतापर्यंत दोनदा विस्तार करण्यात आला आहे प्रत्येक विस्तारानंतर कंपनीमध्ये मोठ्या प्रमाणात नोकर भरती करण्यात आली आहे त्यामुळे येथील स्थानिक कामगारांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध झाले आहेत तसेच कंपनीच्या विस्तार होत असताना अनेक स्थानिकांना वेगवेगळ्या प्रकारचे कामे केली जातात या कामांच्या माध्यमातून सुद्धा उत्पन्नाचे साधन व नवीन कामाच्या संधी उपलब्ध होतात रायगड जिल्ह्यामध्ये महाड, रोहा, रसायनी खालापूर येथे एमआयडीसी असल्याने वेगवेगळ्या कंपन्यांनी आपले कामकाज तेथे सुरु केल्यानंतर त्या तालुक्यातील हजारो लोकांच्या हताला काम मिळाले व आर्थिक उन्नती झाली त्याचप्रमाणे पेण तालुक्यातही जेएसडब्ल्यू कंपनीमुळे तालुक्याचा आर्थिक विकास होऊन तालुक्याचा चेहरा मोहराच बदलला आहे. आत्ता कंपनी तिसऱ्या टप्प्याचा विस्तार करीत असताना याकरिता कंपनी हजारो कोटी रुपयांचा खर्च करणार आहे या निधीचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदा तालुक्यातील व्यावसायिकांना व ठेकेदारांना तसेच थेट फायदा कामगारांना होणार आहे.ज्याप्रमाणे कंपनीचा विस्तार होईल त्याच प्रमाणात कंपनीचा व्यवसायही वाढेल. उत्पादन वाढवण्याकरिता कामगारांची गरज लागते. त्यामुळे कपनज्याप्रमाणे कंपनीचा विस्तार होईल त्याच प्रमाणात कंपनीचा व्यवसायही वाढेल. उत्पादन वाढवण्याकरिता कामगारांची यांची गरज लागते.

त्यामुळे कंपनी वेळोवेळी कामगार भरती करीत असते. कंपनीच्या वतीने तालुक्यात विविध ठिकाणी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात या उपक्रमांतर्गत सभोवतालच्या गावांमध्ये समस्या सोडविण्यात येतात. हे सर्व सामाजिक उपक्रम कंपनीच्या सीएसआर फंडातून राबविण्यात येतात याकरिता कोट्यावधी रुपयांचा निधी कंपनी दरवर्षी उपलब्ध करून देते तसेच या अंतर्गत करण्यात आलेल्या कामांचा दर्जा सर्वोत्तम कसा राहील याकरिता जातीने लक्ष घालते.

पेण तालुक्याच्या सर्वांगीण विकासामध्ये कंपनीचा सिंहाचा वाटा असून तालुक्यातील नागरिकांचे उत्पन्न सुद्धा कंपनीच्या माध्यमातून वाढले आहे.

जेडब्ल्यू कंपनीचा विस्तार व्हावा अशी तालुक्यातील अनेक युवकांची इच्छा आहे कारण या माध्यमातून या सुशिक्षित युवकांना पेण तालुक्यातच रोजगार उपलब्ध होणार आहे त्यामुळे येथेच राहुन त्यांना आई-वडिलांची सेवा व कंपनीचे काम करता येईल.

पेण तालुक्याचा तालुक्यातील सर्वांगीण विकास करता कंपनीचा विस्तार होणे हे काळाची गरज असून या माध्यमातून तालुकातील नागरिकांचाही विकास होणार आहे अशी चर्चा सध्या विविध समाज माध्यमांवरती होत असून कंपनीच्या जनसुनावणीच्या वेळी कंपनीच्या विस्तार व्हावा या मागणी करिता अनेक स्थानिक आपला आवाज बुलंद करणार आहेत असेच काही चे चित्र सध्या दिसत आहे.

# महायुतीचे घोटाळे उघड, निवडणूक आयोग गप्प का?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १० :

शरद पवारांना काही लोक निवडणुकीपूर्वी भेटले आणि 160 जागांवर विजय मिळवून देतो विशिष्ट रक्कम द्या अशी मागणी केली. असेच काही लोकं उद्धव ठाकरेंना लोकसभा आणि विधानसभेलाही भेटले होते. उद्धव ठाकरेंनी त्यांना सांगितले आमचा लोकशाहीवर विश्वास आहे, त्यावेळी मी तिथे उपस्थित होतो. देशातील वातावरण पाहता आम्ही लोकसभा जिंकू असे त्यांना ठाकरेंनी सांगितले आणि आम्ही जिंकलो ही. असे घोटाळे करत निवडणूक जिंकण्याची आम्हाला गरज वाटत नाही, असे उबाठाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे ह्या महायुतीचे अनेक घोटाळे आहेत. या घोटाळे करणाऱ्या सरकारच्या विरोधात अनेकदा आवाज उठवून देखील राज्यपालांपासून मोदी-शहा यांच्यापर्यंत कोणीच काही ऐकायला तयार नाही, असे म्हणत उबाठाचे नेते संजय राऊत यांनी महायुती वर टीकास्त्र डागले आहे. महाराष्ट्र



संजय राऊतांचा सवाल

लुटणाऱ्या या दगा बाज सरकारला पाठीशी घालते जात आहे. यामुळे लोकांमध्ये जात जागृती करणे हाच एकमेव पर्याय आमच्याकडे आहे.

संजय राऊत म्हणाले की, विधानसभेवेळी वेळी पुन्हा ते लोक आले तेव्हा आम्ही त्यांना सांगितले लोकसभा जिंकलो विधानसभेला आम्ही नक्कीच सत्तेवर येणार. तेव्हा त्या लोकांचे म्हणणं होते अडचणीतील 65 जागा सांगा त्या आम्ही तुम्हाला एश्ट च्या माध्यमातून विजयी करुण देतो. आम्ही त्या गोष्टीला स्पष्ट नकार दिला. त्यांनी स्पष्ट सांगितले की सत्ताधाऱ्यांनी ही योजना तयार केली आहे, तुमचे अपयश मला दिसते आहे, पण आमचा निवडणूक आयोग आणि लोकशाहीवर विश्वास आहे असे आम्ही त्यांना सांगितले. पण आता या गोष्टीमध्ये तथ्य आहे असे दिसून येत आहे.

संजय राऊत म्हणाले की,राहुल गांधी यांनी निवडणूक आयोग आणि भाजपचा इतका मोठा घोटाळा बाहेर काढला. तरीसुद्धा निवडणूक आयोग राहुल गांधी यांना शपथपत्र मागत आहे. त्यांनी पुराव्यानिशी हे सगळे सांगितले असताना शपथपत्र मागितले जात आहे. राहुल गांधी देशाचे विरोधी पक्षनेते आहेत. ते जबाबदारीने बोलत असून त्यांनी पुराव्यानिशी बोलत आहे. मत चोरीच्या शहानिशा माध्यमांनीही केली तरीही निवडणूक आयोग पुरावे मागत असेल तर त्यांच्या डोळ्यावर पट्टी बांधली असून तोंडात बोळा कोंबलेला आहे हे दिसत आहे.

संजय राऊत म्हणाले की, माझे मत कुणाला गेले हे मला समजले पाहिजे तसा मला संविधानाने अधिकार दिला आहे. निवडणूक पद्धतीमध्ये इतके घोटाळे आहेत की मोदी-शहा-फडणवीस यांच्यासारखे लोक संपूर्ण निवडणूक पैशाच्या आणि सत्तेच्या जीवावर चोरतात.

## आवाळपूर येथे राजस्व समाधान शिबिर

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**कोरपना, दि. १० ऑगस्ट :** कोरपणा तालुक्यातील आवाळपूर येथे ४ ऑगस्ट २०२५ रोजी राज्य शासनाच्या आदेशानुसार १ ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत संपूर्ण राज्यात महसूल सप्ताह साजरा करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर दिनांक ४ ऑगस्ट रोजी आवाळपूर (ता. कोरपना)येथे 'छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिर' आयोजित करण्यात आले.या शिबिराचे उदघाटन उपविभागीय अधिकारी रवींद्र माने यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोरपना तहसीलदार पल्लवी आखरे होत्या.

## नागभीड येथे महसुल सप्ताह साजरा

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**नागभीड, दि. १० ऑगस्ट :** महाराष्ट्र सरकारने १ऑगस्ट ते ७ऑगस्ट कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येत असून जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी यांचे अंतर्गत तहसीलदार यांनी तालुक्यात विविध उपक्रमाची सुरुवात ऑगस्ट दिनी केली आहे. १ ऑगस्ट रोजी महसूल दिनाची सुरुवात विविध प्रमाणपत्राचे व कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांना पुरस्कार वितरण करण्यात आले. २ऑगस्ट रोजी तालुक्यातील सावरगाव व मजली येथील घरकुल लाभार्थ्यांना अतिक्रमण जागेचेमान्यावरचे हस्ते पट्टे वाटप करण्यात आले.

# युवतीचे अश्लील चित्रफित प्रसार माध्यमातून प्रसारीत करणाऱ्या युवकाविरूध्द गुन्हा दाखल

### भिसी पोलीस स्टेशन अंतर्गत घटना

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. १० ऑगस्ट :** चिमूर तालुक्यातील पोलीस स्टेशन भिसी अंतर्गत एका गावातील युवतीला मागील तीन वर्षांपासुन प्रेम जाळ्यात ओढून तिच्यासह बळजबरीने शारीरीक संबंध प्रस्थापित केले व युवतीचे अश्लील चित्रफित बनवून प्रसार माध्यमातून प्रसारीत करणाऱ्या आरोपीला पिडीत मुलीच्या फिर्यादीवरुन भिसी पोलीसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंद करून शनिवारला अटक केली.

भिसी पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या एका गावातील राकेश कैलास चौधरी (२२) याचे गावातीलच एका १९ वर्षीय युवतीशी सुत जुळले. मागील तिन वर्षांपासुन त्या दोघांमध्ये सुरू असलेल्या प्रेम प्रकरणामुळे अनेकदा शारीरीक संबंध प्रस्तापीत झाले. दरम्यान आरोपी युवकाने पिडीत युवतीला न सांगता तिचे अनेक अश्लील चित्रफीत काढले. नंतर अनेकदा अश्लील चित्रफीत चा धाक दाखवून युवतीशी बळजबरीने शारीरीक संबंध प्रस्थापित केले. शनिवार ९ ऑगस्ट ला आरोपीने युवतीचे अश्लील चित्रफीत समाज माध्यमातून प्रसारीत करून युवतीची बदनामी केली.

सदर बाब युवतीच्या लक्षात येताच आपल्या पालकांना सोबत घेऊन आरोपी राकेश विरुध्द भिसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. भिसीचे ठाणेदार मंगेश भोंगाडे, सह.उपनिरीक्षक रविन्द्र वाघ व सह.उपनिरीक्षक थिटे यांनी घटनेचे गांभिर्य लक्षात घेता लगेच एका गावातून आरोपीला अटक केली.

भिसी पोलीसांनी आरोपी विरूध्द ६४,६४(२), (एम ) बि एन एस, आर/ डब्ल्यू ३(१)( डब्ल्यू)( आय) ( डबल आय),३ (२)( व्ही ए), आर/ डब्ल्यू ६६( ई), ६७( ए) बलात्कार, सह विवीध कलमाअंतर्गत गुन्हा नोंद केला. पुढील तपास ब्रम्हपुरी चे उपविभागीय अधीकारी करीत आहेत.

## मोटरसायकल - बोलेरोच्या अपघातात पती- पत्नी जखमी

### भिसी- उमरेड महामार्गावरील घटना

चिमुर तालुक्यातील भिसी येथील ज्ञानेश्वर कवडू मुंगले वय ४० वर्षे व शालीनी ज्ञानेश्वर मुंगले वय ३५ वर्षे हे दोघेही पती - पत्नी आपल्या एक वर्ष वयाच्या चिमुकलीला घेऊन आज रविवारला सकाळी अंदाजे १०-३० वाजताचे सुमारास मोटरसाइकिल ने उमरेड ला उपचाराकरिता दवखाण्यात जात असतांना राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २५३( ई) भिसी वरून अंदाजे ३ कि मी अंतरावरील श्रीहरी गजानन जिनिंग च्या जवळ मागेहुन भरधाव वेगाने बुलेरो कंपनी च्या पिक अप ने जोरदार धडक दिल्या ने मोटरसाइकिल वरिल पती- पत्नी सिमेंट रोडवर पडल्याने जखमी झाले तर एक वर्ष वयाची चिमुकली दुरवर फेकल्याने रोड च्या बाजुला फेकल्याने किरकोळ जखमी झाल्याची घटना घडली. यावेळी शेतात काम करणारे मजुर धावुन आले व ताबडतोब जखमींना प्राथमिक आरोग्य केंद्र भिसी येथे उपचाराकरिता दाखल केले. डॉक्टरांनी उपचार करून जखमी पती - पत्नी ला पुढील उपचाराकरिता नागपुर ला पाठविण्यात आलेले आहे. पुढील तपास भिसी पोलीस करित आहेत.

## सर्पदंशाने विद्यार्थ्यांचा मृत्यू

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. १० ऑगस्ट :** तालुक्यातील भिसी येथील नागपूर ला १२ वी मध्ये शिक्षण घेत असलेला ओम नंदकिशोर येरूणकर वय १८ वर्षे या विद्यार्थ्यांचा विषारी सर्पदंशाने उपचारादरम्यान नागपूरला मृत्यू झाल्याची घटना शनिवारला घडली.



ओम येरूणकर हा आपल्या आई-वडील व एक मोठा भाऊ यांचे सोबत नागपूरला खापरी परिसरात राहत होता. मागील पाच - सहा दिवसांपुर्वी नागपुर ला रात्री च्या सुमारास झोपेत विषारी सर्पदंश झाला परंतु साप दिसुन न आल्याने उंदिर चावला असावा असा गैरसमज झाल्याने ओमवर तात्काळ उपचार होऊ शकला नाही मात्र दुसरे दिवशी विषारी सर्पदंशाचे लक्षणे दिसुन आल्याने त्याला नागपूर येथील दवाखाण्यात उपचाराकरिता दाखल केले व तेथे उपचार सुरू असतांना शनिवार ला ओमची प्राणज्योत मालविली. मृतक ओम नंदकिशोर येरूणकर यांच्यावर भिसी येथे रविवार ला अंतिम संस्कार करण्यात आले. मृतक ओम येरूणकरच्या पश्चात आई, वडील, मोठा भाऊ व बराच मोठा आप्त परिवार आहे.

# जन सुरक्षा विधेयक २०२४ विरोधात मूल येथे कार्यशाळा संपन्न

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**मूल, दि. १० ऑगस्ट :** जनसुरक्षा विधेयक या काळ्या कायद्याच्या विरोधात हा संविधान विरोधी कायदा रद्द करण्याच्या दृष्टीने राज्यभरामध्ये एक मोठे आंदोलन निर्माण करण्यात येत आहे कारण या कायद्यान्वये अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या, संघटन बनवण्याचा, आपल्या अधिकारासाठी ,आपल्या शिक्षणासाठी, आपल्या रोजगारासाठी, आपल्या शेतीविषयक हक्कांसाठी , महिलांच्या अधिकार रक्षणासाठी संघटन बनविणे ,धरणे देणे, आंदोलन करणे, मोर्चा काढणे तर दूरच एकूणच आमच्या स्वातंत्र्याला पूर्णपणे नकारणारे हे विधेयक आहे. या विरोधात आंदोलन उभे करण्याच्या दृष्टीने मुल मधील सर्व पुरोगामी संघटनांची आज सभा आयोजित करण्यात आली.



या सभेला मुख्य मार्गदर्शक म्हणून चंद्रपूरचे किशोर जामदार, माननीय नामदेवराव कन्नाके यांनी मार्गदर्शन केले.

प्रत्यक्षात कायद्यामध्ये असलेल्या तरतुदी आणि कायदा तयार करणारे सरकार आणि सरकारची जबाबदार मंडळी जे वक्तव्य करीत आहेत यांच्यामधली तफावत मान्यवरांनी सविस्तरपणे मांडली.

कायद्यामध्ये जरी फक्त डाव्या कडव्या संघटना असा उल्लेख करण्यात आला असला तरी कुठलाही प्रकारच्या हक्क अधिकारासाठी कोणत्याही संघटनेचा कोणत्याही पदाधिकारी कोणत्याही पक्षाचा कोणताही कार्यकर्ता किंवा व्यक्तिगतरीत्या सुद्धा कोणी सरकार विरोधात कुठलेही वक्तव्य सुद्धा केले आंदोलन आणि धरणे करणे तर दूरच तरी त्या कायद्यामध्ये त्या व्यक्तीवर आणि संघटनेवर बंदी आणून त्यांना जेलमध्ये टाकण्याचा अधिकार या कायद्यान्वये सरकारला मिळणार आहे

विशेष म्हणजे न्यायपालिकेला या कायद्याच्या प्रक्रिया मधून संपूर्णतः दूर ठेवण्यात आलेला आहे कारण न्यायालयामध्ये दात बघण्याची कुठलीही तरतूद या कायद्यामध्ये नाही.

तसेच अर्बन नक्षलवाद या नावाखाली जी बोंबाबोंब हे सरकार करीत आहे त्याचा कुठलाही उल्लेख या कायद्यामध्ये नाही आणि म्हणून आपल्या कुठल्याही अधिकारासाठी आणि हक्कासाठी जो आंदोलन अधिकार करण्याचा अधिकार संविधानाने प्रत्येक नागरिकास दिलेला आहे तो संविधानातील मूलभूत अधिकारच गोठवण्याचा कार्यक्रम या कायद्याद्वारे सरकार करीत आहे पण या कायद्याच्या संबंधांमध्ये पुरेशी जागरूकता आणि पुरेशी माहिती नागरिकांना नसल्यामुळे सरकारच्या भुलथापान्ना जनता बळी पडत आहे. धन विधिमंडळामध्ये विरोधी पक्षांनी सुद्धा घेतलेली भूमिका ही बोटचे पेपणाचीच होती. कारंजा नक्षलवादाच्या नावाखाली हा कायदा सरकार बनवत आहे तो संपवण्यासाठी आधीच कडक कायदे अस्तित्वात आहेत असं असताना संवैधानिकरीत्या कायदेशीर मार्गाने संघटन निर्माण करणाऱ्या आणि आंदोलन करणाऱ्या सर्वसामान्य जनतेला खास करून पुरोगामी कार्यकर्त्यांना सरकारच्या संविधान विरोधी धोरणा विरोधात आवाज उठवण्यापासून वंचित करण्यासाठी हा कायदा बनवण्यात आलेला आहे असेही मार्गदर्शकांनी नमूद केले मुल शहरांमध्ये आणि तालुक्यामध्ये सुद्धा या कायद्याविरोधात मोठे आंदोलन उभारण्याचा मानस उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केला या बैठकीला समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष प्रा. विजय लोणबुले, जिल्हा तैलिक महासंघाचे सचिव कैलास चालक संभाजी ब्रिगेडचे संदीप मोरे, हिरालालजी भडके दीपक पाटील वाढई,डॉ.राकेश गावतुरे , भूमिपुत्र ब्रिगेडचे शहराध्यक्ष नितेश मॅकलवार,राकेश मोहुर्ले आणि इतर बरेच मान्यवर उपस्थित होते.

# बामर्डा रेती घाटातून नियमबाह्यपणे रेती उत्खनन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**वरोरा, दि. १० ऑगस्ट :** वरोरा तालुक्यातील माढेळी ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या बामर्डा गावा शेजारी वाहणाऱ्या वेना नदी पात्रातील रेतीचा उपसा करण्याचा लिलाव जिल्हा स्तरावरून झाला आहे. यात मात्र ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या छोट्या बामर्डा गावातील गावाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एकमेव ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थांची कोणतीही ग्रामसभेचे आयोजन न करता हा लिलाव जिल्हा स्तरावरून करण्यात आला हा लिलाव झाल्यानंतर नदीपात्रातून रेतीचे उत्खनन करण्याचे जे नियम आहेत ते सर्व नियम धाब्यावर बसवून सध्या रेतीचे उत्खनन सुरू आहेत.





नदी पात्रात रेतीचा उपसा करण्यासाठी पोकलेन व बोटीचा चा वापरावर निर्बंध असताना दहा दहा बोटी व पोकलेन चा वापर अहोरात्र सुरू असून गावशेजारी एका शेतकऱ्याचे शेत भाढेतत्वावर घेवून त्याचे शेतात साठवणूक करीत आहे व त्याची वाहतूक दिवस रात्र सुरू आहे. तसेच रेतीचे उत्खनन नियमबाह्यरित्या अहोरात्र सुरू आहे. या उत्खनन संदर्भात तालुका व जिल्हा स्तरावील महसूल तसेच पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यांनी अनेकदा भेटी दिल्या आहेत मात्र यांनी आपले आर्थिक हित साधले.व हा सर्व प्रकार यांच्याच आशीर्वादाने सुरू आहेत यात लोकप्रिनिधींनीही सहभागी असल्याचे बोलल्या जात आहे

या सर्व प्रकारात या गावातील शेतकरी वर्गाची मोठी कुचंबना होत आहे ज्या शेतकरी वर्गानी तीस ते चाळीस वर्षांपासून आपले शेतीला या नदीपात्रातून पाणी उपसा करीत आहे व त्याची रीतसर परवानगी घेतली आहे त्या सर्व शेतकरी वर्गाची सिंचन सुविधा या रेती माफिया यांनी नष्ट केली नदी पात्रातील नैसर्गिक नदी प्रवाहांना अडथळा निर्माण करून रेतीचा उपसा सुरू आहे रेतीची वाहतूक दिवस रात्रौ सुरू आहे

या गावातील मुलांना इयत्ता चौथी नंतरचे शिक्षण माढेली गावात जाऊन घ्यावे लागते त्या साठी गावातून कोणतीही वाहतुकीची सुविधा नसल्याने छोटे विध्यार्थी जीव मुठीत धरून सायकलने शाळेत जातात मात्र रेतीची जी वाहन जातात त्यांचे चालक मात्र विद्यार्थांना साईड देत नाही. त्या मुळे विद्यार्थी व त्यांचे पालकामध्ये सुद्धा भीतीचे वातावरण आहे.या संदर्भात ग्रामस्थ यांनी या प्रकरणाची तक्रार वरोरा तालुक्याचे उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना दिली आहे या संदर्भात तहसीलदार यांनी दिनांक ८ ऑगस्ट रोजी गावाला भेट दिली ग्रामस्थांनी त्यांना सर्व प्रकरणाची माहिती दिली भेटीचे आधीच नदी पात्रात वाळू उपस्या साठी असलेल्या सर्व बोटी तहसीलदार येण्याआधीच नदी पात्रातून काढून झाडाझुडपात लपविण्यात आल्या होत्या या प्रकरणावरून हे महाशय ग्रामस्थांची दिशाभुल करीत असल्याचे बोलले जात आहे या सर्व प्रकरणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे.

हे गाव माढेळी ग्रामपंचायत मध्ये येत असल्याने मध्ये येते ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी बामरडा गावात ग्रामसभेचे आयोजन न करताच मासिक सभेमध्ये रेती घट लीलावा सदर्भात ठराव घेतला आहे अशी ग्रामस्थांची तक्रार असून आमची ग्रामपंचायत फसवणूक करीत असल्याचे ग्रामस्थ बोलत आहे या सर्व प्रकरनी वरिष्ठ अधिकारी दखल घेऊन कारवाई करतील काय या कडे ग्रामस्थांचे लक्ष लागून अशी आहे .



घुग्घुस शहरात विश्व जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून सायंकाळी आदिवासी समाजाकडून अनेक संघटनाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.त्याच्यात आदिवासी समाजाकडून दिव्य रॅली व गोंडी संस्कृतीत नाचत गाजत नृत्य सादर करण्यात आले.

**नागभीड, दि. १० ऑगस्ट :** नागभीड पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या आणि भंडारा आणि चंद्रपूर जिल्ह्य सरहद्द पाहणीं येथे नागभीड पोलिस अधिकारी यांच्या चमूने मुखबीर खबरीच्या आधारे धाड टाकून दोघांना ताब्यात घेऊन एक लाख तीन हजार रुपयांचा मुद्देमाल ३ऑगस्ट रोजी ताब्यात घेण्यात आला.नागभीड पोलिस स्टेशन अंतर्गत अनेक ठिकाणी अवैध देशी दारू सुरू आहे मात्र भंडारा जिल्ह्यात मोहफुलाची दारू मोठ्या प्रमाणात विकली जात असल्याने सीमा सरहद्दीवर अवैध दारू काढणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली.

# अनं विद्यार्थीनींच्या चेहऱ्यावर हसू उमटले

### अदानी फाऊंडेशनचा उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. १० ऑगस्ट :** श्री. साईबाबा ग्रामीण विकास संस्था, गडचिरोली अंतर्गत प्रियदर्शिनी कन्या विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, घुग्घूस येथे शिक्षण घेणाऱ्या विदयार्थीनींना बसण्याकरिता उच्च प्रतिच्या धातूपासून तयार केलेले डेक्स-बेंच दिल्यामुळे विद्यार्थीनींच्या चेहऱ्यावर हसू उमटले.



सामाजिक कार्याकरिता सदैव पुढाकार घेणाऱ्या अदानी फाऊंडेशन चांदा सिमेंट वर्क्स च्या वतीने आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानी अनू चोथे, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून अदानी फाऊंडेशनचे चिफ प्लॅन्ट हेड सत्यनारायण दिगामर्थी, सी.एस.आर. हेड अक्षय पतंगे, फाल्गुन खामणकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विदयार्थीनींना बसण्याकरीता डेक्स-बेंच भेट दिलेत.

यावेळी मार्गदर्शन करतांना सत्यनारायण दिगामर्थी म्हणाले की, शालेय जीवनापासूनच विदयार्थीनींनी स्पर्धा परिक्षेची तयारी करावी. तसेच विदयार्थी दशेतचं वेगवेगळया उपक्रमात भाग घेवून आपले व्यक्तीमत्व तेजस्वी व तपस्वी बनन्यावर भर दिला पाहीजे.

यावेळी अक्षय पतंगे यांनी सुध्दा विदयार्थीनींना मार्गदर्शन करून कारखाण्याकडून होईल तेवढी शाळेला मदत करण्याचे आश्वासन दिले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्या अनू चोथे यांनी अदानी फाऊंडेशनचे आभार मानून प्रत्येक वर्षी असे उपक्रम राबवावे अशी विनंती केली. कार्यक्रमाचे संचालन बलवंत विखार यांनी तर समीक्षा कांबळे हीने आभार व्यक्त केले.

# एकाच पक्षात राहून जीव गुदमरतो...... राजकीय वर्तुळात एकाच लोकनेत्याची खदबद.....

## श्वासासाठी कोणत्या पक्षात ऑक्सिजनची कमतरता ?

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. १० ऑगस्ट :** भद्रावती आणि वरोरा राजकीय क्षेत्रात चांगलीच खदखद सुरु असताना दिसत आहे. लोकनेता स्वतःच्या फायद्यासाठी ४ ते ६ महिन्यात एका पक्षातून दुसऱ्या पक्षात पक्ष प्रवेश करताना पाहावयास मिडत आहे. सध्या गाजत असलेल्या कार्यकर्त्याच्या पायरीवरून चढत आज हा लोकनेता कमी कालावधीत अनेक पक्षात प्रवेश करून राजकीय वर्तुळात जणू खदखद केली आहे. कदाचित कार्बनचे प्रमाण वाढल्याने श्वासासाठी ज्या पक्षात ऑक्सिजन ची कमतरता नाही अशा अनेक पक्षात पक्ष प्रवेश घेण्याची गरज भासलेली दिसली . अशी येथील सर्व कार्यकर्त्या मध्ये जोरदार कुजबुज सुरु आहे.

गत काही वर्षात या लोकनेत्याने अगोदर राष्ट्रवादीची पायरी चालून राजकारणाला सुरवात केली मात्र नंतर ४ ते ६ महिन्यातच उबाठा आणि नंतर काँग्रेस आणि लगेच सत्ताधारी पक्षात पक्ष प्रवेश करून आपल्या स्वतःचा फायदा करून घेतला. मात्र या पक्ष प्रवेशाने या भद्रावती वरोरा क्षेत्रात सर्व पक्षीय कार्यकर्त्यांमध्ये जोरदार कुजबुज सुरु होताना दिसत आहे. कार्बन चे प्रमाण ज्या पक्षात वाढले ते सोडून जिथे श्वासासाठी ऑक्सिजन जास्त प्रमाणात आहे त्या त्या ठिकाणी पक्ष प्रवेश झालेला असा हा लोकनेता गाजलेला दिसत आहे. एका पक्षात राहून सत्ताधारी विरोधी पक्षाचे धिंडवडे करायचे आणि नंतर त्याच पक्षात प्रवेश करायचे अशी आपली स्वतःची छवी निर्माण केलेली या क्षेत्रात दिसत आहे. सध्या प्रसिद्धीसाठी आपल्या छत्र छायेत चतुर विदूषक ठेवल्याचे काही माध्यमामध्ये जोरदार चर्चा रंगू लागलेल्या आहे.

# पाचगाव - पारधीगुडा - मंगी रस्ता नागरिकांसाठी धोकादायक !

### अल्पावधीतच पावसाने रस्त्याचे बारा वाजले, वाहनधारकांना करावी लागते कसरत......

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. १० ऑगस्ट :** चांगले रस्ते देशाच्या विकासाचे प्रतीक आहे. सुसज्ज रस्त्यावरून देशाच्या प्रगतीचा आलेख ठरविल्या जातो. मात्र ग्रामीण भागातील रस्त्याचे भाग्य अजूनही उजळले नसून राजुरा तालुक्यातील पाचगाव पारधीगुडा - मंगी रस्ता नुकताच आलेल्या पावसाने खचल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांसह शेतकऱ्यांना या रस्त्याने जाण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे.




राजुरा तालुक्यातील ग्रामीण भागातील अनेक रस्त्याची अजूनही दुरवस्था झाली आहे.ग्रामीण भागातील रस्त्यांना विकासाची प्रतीक्षा आहे.राजुरा तालुक्यातील पाचगाव- पारधीगुडा - मंगी हा अंबुजा सिमेंट कंपनीकडे जातो.अनेक कामगार व गडचांदुरला जाण्यासाठी अगदी जवळचा मार्ग म्हणून नागरिक या मार्गाचा वापर करतात.हा मार्ग शेतात जाण्यासाठी शेतकऱ्यांच्या सोईचा आहे.मात्र मागील आठवड्यात पडलेल्या पावसामुळे पाचगाव पारधीगुडा मंगी रस्ता काही ठिकाणी खचला आहे. अल्पावधीच या रस्त्याचे बारा वाजल्याने या मार्गावरील वाहनधारकांना जीवघेणी कसरत करीत मार्गक्रमण करावे लागत आहे. या मार्गावर परिसरातील शेतकऱ्यांच्या शेती आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना शेती उपयोगी साहित्य,अवजारे बैल बंडीने शेतात घेऊन जावे लागते.मात्र पारधीगुडा ॐ मंगी रस्त्याची दुरवस्था झाल्याने शेतकऱ्यांना शेती उपयोगी साहित्य वाहून नेण्यासाठी हा रस्ता अडचणीचा ठरत आहे.त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे लक्ष देऊन रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी अशी मागणी पाचगाव येथील सरपंच नामदेव आडे,ग्राम पंचायत सदस्य बाबुराव मडावी, मंगी येथील सरपंच शंकर तोडासे, तिरुपती इंदूरवार, सुधाकर गेडेकर, लक्ष्मण नुलावार, लक्ष्मण गेडाम, गंगाधर गेडेकर, बाबुराव विरदंडे, रमेश शेरकी, गोविंदा काकडे, जितेंद्र चौधरी,मारोती भोयर, मारोती घ्यार, गोपाल जंबुलवार, रुपेश गेडेकर व परिसरातील नागरिकांनी केली आहे.

### धोकादायक रस्त्यावरून नागरिकांचा जीवघेणा प्रवास

पाचगाव पारधीगुडा मंगी हा वाहनधारकांसाठी अतिशय महत्त्वाचा मार्ग आहे. या मार्गावरून शालेय विद्यार्थी, कामगार,शेतकरी व परिसरातील वाहनधारक गडचांदुरला जाण्यासाठी अत्यंत जवळचा मार्ग म्हणून या मार्गाचा वापर करतात. मात्र मागील आठवड्यात पडलेल्या पावसामुळे या रस्त्याचा काही भाग खचल्याने रस्ता धोकादायक झाला आहे. त्यामुळे नागरिकांना या मार्गावरून जीवघेणा प्रवास करावा लागत आहे.

# सर्व आरोपी निर्दोष, मग बॉम्बस्फोट घडवले कोणी ?

महाराष्ट्रनामा



सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@ gmail.com

दि. २९ सप्टेंबर २००८ रोजी मालेगाव येथे झालेल्या बॉम्बस्फोटांत ७ जण ठार व १०० जखमी झाले. या प्रकरणात स्थानिक पोलीस, एटीएस आणि एनआयए अशा तीन तपास यंत्रणांनी आपले सर्वस्व पणाला लावले. सखोल तपास करून चौदा जणांना अटक केली. साध्वी प्रज्ञा सिंह, ले. कर्नल प्रसाद पुरोहितांवर गंभीर गुन्हे दाखल झाले. त्यांनीच बॉम्बस्फोट घडवले असे तपास यंत्रणांनी न्यायालयात आटापीटा करून सांगितले. प्रत्यक्षात सबळ पुराव्या अभावी या सर्वांची एनआयए विशेष न्यायालयाने ३१ जुलै २०२५ रोजी निर्दोष मुक्तता केली. त्यामुळे मालेगाव बॉम्बस्फोट कोणी घडवले व सात जणांचा बळी कोणी घेतला या प्रश्नाचे उत्तर सतरा वर्षानंतरही मिळाले नाही.

मालेगाव येथे भिक्कू चौकात बॉम्बस्फोट झाले. त्यावेळी रमझानचा महिना चालू होता. घटनेनंतर पकडलेले आरोपी हिंदू होते. तेव्हा केंद्रात व राज्यात काँग्रेसचे सरकार होते. काँग्रेसच्या बड्या नेत्यांनी या घटनेचा उल्लेख करताना भगवा दहशतवाद असा शब्दप्रयोग वापरला होता. न्यायालयाने सर्व आरोपींना निर्दोष मुक्त केले तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, भगवा दहशतवाद कधीच नव्हता व कधीही असणार नाही, अशी प्रतिक्रीया दिली.

भाजपाच्या माजी खासदार साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, मेजर रमेश उपाध्याय, सुधाकर चतुर्वेदी, समीर कुलकर्णी यांच्यासह चौदा आरोपी या खटल्यात होते. हे सर्व आरोपी अभिनव भारत या हिंदुत्ववादी संघटनेशी व हिंदुत्ववादी विचाराशी निगडीत होते, असे एटीएसने दाखल केलेल्या आरोपपत्रात म्हटले होते. या आरोपींवर आयपीसी, मकोका, युएपीए अंतर्गत गुन्हे दाखल केले होते. एटीएस महाराष्ट्रातील प्रभावी तर एनआयए ही राष्ट्रीय पातळीवरील शक्तिशाली तपास यंत्रणा असूनही सर्व आरोपी सबळ पुराव्या अभावी निर्दोष सुटतात, याचा अर्थ काय असू शकतो ? दि. ११ जुलै २००६ रोजी मुंबई उपनगरीय रेल्वेत सात धावत्या लोकल्समधे सात ठिकाणी बॉम्बस्फोट झाले व त्यात १८९ निरापराधी प्रवासी ठार झाले व ८२४ जखमी झाले होते. लोकल्स ट्रेन बॉम्ब स्फोटाचा बदला घेण्यासाठी मालेगावात बॉम्बस्फोट घडवले असे तर्क मांडले गेले . मुंबई लोकल ट्रेन बॉम्बस्फोट व मालेगाव बॉम्बस्फोटात विश्वास ठेवावा असे भक्कम पुरावे कोर्टापुढे आले नसतील तर त्याला जबाबदार कोण ? केवळ संशयावरून दोषी ठरवता येणार नाही, असे कोर्टाने निकालपत्रात म्हटले आहे. मग खरे गुन्हेगार कुठे आहेत ? त्यांना कधी पकडणार ? पिडितांना न्याय कधी मिळणार ? ट्रेन बॉम्बस्फोटाची घटना २००६ मधे घडली. विशेष सत्र न्यायालयाने पाच जणांनी फाशीची तर सात जणांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. एका आरोपीची निर्दोष सुटका झाली तर एकाचा जेलमधेच मृत्यु झाला. मुंबई उच्च न्यायालयाने २१ जुलै २०२५ रोजी सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. त्यावर सरकारने जनक्षोभ लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली व उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती मिळाली. मात्र बाहेर आलेले आरोपी पुन्हा जेलमधे जाण्याची गरज नाही असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. ट्रेन बॉम्बस्फोटाच्या घटनेनंतर १९ वर्षानंतरही खरे गुन्हेगार कोण हे सांगता येत नाहीत यापेक्षा दुर्दैव काय असू शकते ?

मालेगाव बॉम्बस्फोटात मिळालेल्या बाईकमधे स्फोटके होती हे कोर्टासमोर सिध्द करण्यास तपास यंत्रणंना अपयश आले. तपास यंत्रणांनी बॉम्बस्फोटात १०१ लोक जखमी झाल्याचे म्हटले होते, प्रत्यक्षात ९५ आहेत असे कोर्टाला आढळून आले. वैद्यकीय प्रमाणपत्रे जी सादर करण्यात आली, त्यात फेरफार करण्यात आलेले आहेत असे कोर्टाने नमूद केले आहे. स्फोटात वापरण्यात आलेल्या बाईकचा चासिस नंबर तपासात कधीच सापडला नाही, तसेच ती बाईक साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर यांच्या मालकीची आहे हे सिध्द करता आले नाही. रमझानच्या महिन्यात मालेगावात मोठा पोलीस बंदोवस्त असताना संशयित बाईक घटनास्थळी आलीच कशी ? याचे उत्तर पोलिसांना देता आले नाही. कर्नल प्रसाद पुरोहित यांनी आरडीएक्स आणले हे तपास यंत्रणांना सिध्द करता आले नाही. अभिनव भारत या संघटनेने दहशतवादी कारवायांसाठी आरोपींना पैसा पुरवला हेही पोलिसांना कोर्टासमोर सिध्द करता आले नाही. आरोपींवरील गुन्हे सिध्द करण्यासाठी ठोस पुरावे नाहीत असे कोर्टाने निकालपत्रात म्हटले आहे.

मालेगावात बॉम्बस्फोट घडविण्यापूर्वी आरोपींच्या ठिकठिकाणी बैठका झाल्या असे आरोपपत्रात म्हटले आहे. पण त्याचे ठोस पुरावे देता आले नाहीत. आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई केली होती, नंतर मकोका मागे घेण्यात आला, त्यामुळे मकोका अंतर्गत त्यांचे घेतलेले जाबजबाबही रद्द झाले. आरोपींवर युएपीए अंतर्गत कारवाई चुकीची होती हेही नंतर स्पष्ट झाले. तपास यंत्रणांनी कोर्टासमोर जे फोन कॉल्सचे रेकॉर्ड सादर केले, ते तपासण्यासाठी गृह विभागाच्या सचिवांची मंजुरी घेतली नव्हती. स्फोटात आरडीएक्स वापरले पण त्याचा स्त्रोत तपास यंत्रणांना सिध्द करता आला नाही. स्फोटके कर्नल पुरोहितांनी काश्मीरमधून आणली हे कोर्टापुढे सिध्द करता आले नाही. कोणत्या आरोपीच्या घरी बॉम्ब तयार करण्यात आले हे याचा पुरावा देता आला नाही. एटीएस व एनआयआय या दोन्ही तपास यंत्रणांच्या अहवालात विसंगती दिसून आली. मुळात एकाच घटनेचा तपास दोन– दोन यंत्रणांकडे एकाच वेळी का देण्यात आला, हे समजले नाही. एवढ्या गंभीर त्रूटी किंवा चुका किंवा परस्पर विरोधी निदाने एटीएस आणि एनआयए यांनी केलेल्या तपासात कशा असू शकतात ? एटीएस व एनआयए यांनी सादर केलेल्या आरोपपत्रांमधे काही मुद्द्यावर तफावत असल्याचेही कोर्टाच्या निदर्शनाला आले.

नांदेड येथे पाटबंधारे वसाहतीत दि. ६ एप्रिल २००६ रोजी झालेल्या बॉम्बस्फोटात २ ठार व ४ जखमी झाले होते. तपास एटीएस व सीबीआयने केला. आरोपींचा पूर्णा, परभणी व जालना येथील बॉम्बस्फोटाशी संबंध असल्याचा तपासानंतर दावा करण्यात आला. आरोपी हिंदुत्ववादी संघटनांशी निगडीत असल्याचे सांगण्यात आसे. दोन हजार पानी आरोपपत्र दाखल केले. नांदेड न्यायालयाने ४ जानेवारी २०२५ रोजी दिलेल्या निकालात सर्व बारा आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

मुंबई लोकल ट्रेन, मालेगाव, नांदेड या तिनही घटनांमधे बॉम्बस्फोटाचा तपास एटीएसने केला व तिनही प्रकरणात आरोपी निर्दोष सुटले , हे काही महाराष्ट्र पोलिसांना भूषणावह नव्हे.

मालेगाव बॉम्बस्फोट खटल्यात एटीएसने सादर केलेले पुरावे एकमेकांशी जुळत नव्हते किंवा परस्परविरोधीही आढळले. एनआयएच्या विशेष न्यायालयात सर्वच आरोपींनी मकोका अंतर्गत कारवाईला आव्हान दिले. साध्वी प्रज्ञासिंह यांनी मालेगाव प्रकरणात आपला जेलमधे पोलसांनी क्रूरपणे छळ केला असे म्हटले आहे. त्यांनी बड्या पोलीस अधिकाऱ्यांची नावेही घेतली आहेत. तसेच एका तपास अधिकाऱ्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना अटक करण्यासाठी आपल्यावर दबाव आणला होता असेही म्हटले आहे. विशेष म्हणजे मालेगाव प्रकणातील २०१६ मधे गायब झालेले महत्वाचे १३ दस्तऐवज शेवटपर्यंत सापडलेच नाहीत.

# ...हा तर 'साप म्हणत भूई थोपटण्याचा' प्रकार!

गुरुवार (दि.७) रोजी काँग्रेसचे नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते (?) राहुल गांधी यांनी दिल्लीत एक प्रेझेंटेशन सादर केले. या प्रेझेंटेशन सोहळ्याला(?) अनेक विरोधी पक्षांचे नेते हजर होते. सदरच्या प्रेझेंटेशनमध्ये राहुलबाबा ऊर्फ सीनियर पप्पूने जुनेच रडगाणे गात, मतचोरीबाबत आरोप केले. या आरोपांवरून राजकीय वातावरण मात्र चांगलेच तापले आहे.

राहुल गांधी यांनी 'पुराव्या'सह प्रेझेंटेशन सादर करत थेट निवडणूक आयोगावर आरोप केले. त्यानंतर महाराष्ट्र, बिहारसह अनेक राज्यांतील निवडणूक अधिका–यांनी राहुल गांधी यांना पत्र लिहून नियमानुसार ' दावा खरा असेल तर सहीसह प्रतिज्ञापत्र सादर करा' असे आव्हान त्यांना दिले आहे. प्रतिज्ञापत्र सादर केल्यानंतर त्याचा अभ्यास केला जाईल; आणि गरज पडल्यास चौकशीही करता येईल, असेही निवडणूक आयोगाने म्हटले आहे. राहुल यांना, मतचोरीबाबतचे त्यांचे दावे सत्य वाटत असतील तर त्यांनी प्रतिज्ञापत्र सादर करावे. यात त्यांना काहीच अडचण नसावी. मतदार यादीत चुकीच्या पद्धतीने समाविष्ट केलेली किंवा काढून टाकलेल्या मतदारांची नावेही त्यांनी सादर करावीत. राहुल गांधी प्रतिज्ञापत्र सादर करणार नसतील तर, त्यांचा त्यांच्या दाव्यावर विश्वास नाही, हे स्पष्ट होईल आणि त्यांचे आरोप आधारहीन असल्याचा निष्कर्ष निघेल, असे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

परदेशात आपल्या देशाविरुध्द 'बेताल' वक्तव्य करणा–या राहुलबाबाने नेहमीप्रमाणेच तथ्यहीन बडबड केली. तुम्ही निवडणूक आयोगावर अक्षरशः गंभीर आणि न पटणारे आरोप केले आहेत. त्याला निवडणूक आयोग आव्हान देणार, हे क्रमप्राप्त आहे. पण, तुम्ही सरळसरळ खोटे बोलत आहात, हे तुम्ही घेतलेल्या पळकुट्या भूमिकेवरून स्पष्ट झाले आहे. तुमचे आरोप खरे असते आणि तुमच्याकडे पुरावे असते तर 'कर नाही त्याला डर कशाला'? या युक्तीनुसार सहीसह प्रतिज्ञापत्र सादर केले असते. पण, तुम्ही शेपूट घालत 'संसदेत शपथ घेतली आहे' असे थातुरमातुर उत्तर देऊन जबाबदारी झटकून मोकळे झाले. यावरून 'आडातच नाही तर पोह–यात कुठून येणार'? हे स्पष्ट झाले.

राहुलबाबाच्या या 'अर्थहीन' प्रेझेंटेशनला हजर असलेल्या बारामतीच्या दगाबाज 'करामती' काकाला एकदम जाग आली. मग त्यांनीही विधानसभा निवडणुकी दरम्यान माझ्याकडे २ माणसे आली होती. त्यांनी १६० जागा जिंकून देतो, अशी ऑफर दिली होती, असे विधान केले. मी त्यांना राहुलकडे घेऊन गेलो. पण, आमच्या बुद्धीला ते पटले नाही, म्हणून आम्ही त्या 'डील'ला नकार दिला, अशी 'मल्लीनाथी' जोडली. वृत्तवाहिन्यांच्या म्हणण्यानुसार हे 'खळबळजनक' वृत्त असेल. पण, शेंबड्या पोरालाही समजले की, जे बोलणार ते करणार नाही. पण, जे करतात ते कधीही बोलत नसणा–या काकांनी अक्षरशः खोटे बोलत, जनतेत संभ्रम निर्माण व्हावा म्हणून हे पिल्लू सोडले आहे. काकांच्या या 'तथ्यहीन' दाव्यावर अनेक प्रश्न उपस्थित होतात.

तुम्हाला आजच का जाग आली? इतक्या दिवस तुम्ही 'कोमात' होता का? 'भावी पंतप्रधान', 'जाणता राजा', 'चाणक्य' अशी तुमची राजकारणात ख्याती आहे. याचा अर्थ असा की, तुम्ही या देशाचे खुप जबाबदार नागरिक आहात. जबाबदार व्यक्ती म्हणून 'लोकशाही' अबाधित राहण्यासाठी तुम्ही निवडणूक आयोग किंवा पोलिसांत तक्रार दाखल का केली नाही? राहुल गांधी हे विरोधी पक्षनेते आहेत. त्यांच्या निवासस्थानी अथवा कार्यालयात येणा–या–जाणा–या प्रत्येक व्यक्तीची नोंद असणारच. मग तुम्ही त्या व्यक्तींची नावे आता आठवत नाहीत, असे सपशेल खोटे का बोलता? सगळ्यात महत्त्वाचे आणि हास्यास्पद म्हणजे, 'पाठीत खंजीर खुपसणे' असे ऐकताना, वाचताना ज्या माणसाचा चेहरा डोळ्या समोर येतो. सत्तेत राहण्यासाठी किंवा तिच्या आसपास राहण्यासाठी जो 'धूर्त' माणूस जनतेच्या पाठीत खंजीर खुपसून 'मविआ'सारख्या 'अभद्र' युतीला जन्म देतो, असा माणूस अशी 'सुवर्णसंधी' सोडेल, ये कुछ हजम नही होता.

सलिमने कथेचा अर्धा भाग सांगितला. मग, जावेद कसा मागे राहील. 'फेक नॅरेटिव्हचा बादशहा' आणि 'एक नंबरचा थापाड्या' अशी राजकारणात ख्याती असणा–या आणि काकांच्या घरची भांडी घासण्याची सवय लागलेल्या 'भांडूपच्या देवानंद'ला एकदम साक्षात्कार झाला. त्यानेही काकांची री ओढत, उध्दव ठाकरे आणि मलाही त्यावेळेस काही लोक भेटले होते; आणि त्यांनी ६०/६५ जागा जिंकून देतो, अशी ऑफर दिली होती. परंतु, आमचा 'लोकशाही'वर विश्वास आहे, असे सांगून नकार दिला, अशी मुक्ताफळे उधळली. एकवेळ दुस–या कोणी नेत्याने असा आरोप केला असता तर, एकवेळ पटले असते. पण, भाजप आणि त्यांच्या नेत्यांच्या द्वेषाची काविळ झालेल्या आणि रोज विषारी फुत्कार टाकणा–या या माणसाचे हे तथ्यहीन आरोप म्हणजे, 'राहुलबाबाची पालखी वाहण्या'चा केलेला केविलवाणा आणि लाचार प्रयत्न आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये, असो.

निवडणूक आयोगाने एकदा, दोनदा नव्हे तर, चार वेळा 'ईव्हीएम मशिन हॅक करून दाखवा' असे आव्हान दिले होते. पण, एकही पक्ष अथवा तंत्रज्ञ पुढे का आला नाही? या प्रश्नातच सर्व काही स्पष्ट होते. लोकसभेत 'फेक नॅरेटिव्ह'मुळे यश मिळाले. ते यश डोक्यात गेले. अहंकार वाढला, शेवटपर्यंत जागा वाटपाचा घोळ कायम होता. त्यामुळे 'मविआ'चा दारूण पराभव झाला. हे उध्दव ठाकरे यांनी 'हास्यजत्रा'च्या 'महाएपिसोड'मध्ये कबूल केले आहे. महत्त्वाचे म्हणजे 'राजकारण' आणि 'खेळ' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एकाचा 'विजय' आणि दुस–याचा 'पराभव' ठरलेला आहे. खिलाडीवृत्तीने जो पराभव स्वीकारतो, तोच खरा खिलाडी असतो. पण, आजच्या 'गलिच्छ' राजकारणात 'सूड' आणि 'द्वेषा'ने बरबरटलेल्या नालायक कारभा–यांचा भरणा अधिक असल्याने असेच 'सडके' राजकारण आपणास बघायला मिळेल, यात तिळमात्र शंका नाही.

खरे तर लोकशाही अबाधित ठेवण्याचे या नेत्यांचे आद्यकर्तव्य आहे. पण, स्वतःच्या स्वार्थासाठी आणि 'बिनपाण्याशिवाय तडफडणा–या माशासारखी' गत झालेले हे कारभारी सत्ता हस्तगत करण्यासाठी 'साप साप म्हणत भूई थोपटण्या'चा दयनीय आणि केविलवाणा प्रयत्न करत आहेत, हे सूज्ञ मतदार चांगलेच जाणून आहेत.

**प्रदीप व्ही. खोलमकर,**
**नाशिक.**
**मोबाईल– ८७६७५०२९८०.**

# 'ॐ नम: शिवाय' कपड्यांवर नको !




श्रावण मास सुरु असल्याने सर्वत्रचे वातावरण भक्तिमय झाले आहे. श्रावण मासात शिवभक्त भगवान शिवाची विशेष भक्ती करतात. काही जण प्रत्येक सोमवार निर्जली उपवास करतात तर काही जण श्रावण मास पादत्राणे परिधान करत नाहीत, या मासातील प्रत्येक सोमवारी शिवमंदिरात शिवभक्तांच्या रांगा लागलेल्या पाहायला मिळतात. याच दिवसांत ॐ नम: शिवाय। हा मंत्रजप लिहिलेले सदरे, शर्ट्स तयार कपड्यांच्या दुकानात विक्रीला ठेवलेले पाहायला मिळतात. महाशिवरात्र आणि श्रावण महिन्याच्या दरम्यान ऑनलाईन संकेतस्थळांवरसुद्धा अशा कपड्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. बारा ज्योतिर्लिंग तसेच भगवान शिवाची पुरातन मंदिरे ज्या ठिकाणी आहेत अशा ठिकाणी या स्वरूपाच्या कपड्यांचे स्टॉल्स पाहायला मिळतात. प्राचीन शिवमंदिराच्या ठिकाणी भरणाऱ्या जत्रांमध्ये सुद्धा 'ॐ नम: शिवाय।' मंत्रजप प्रिंट केलेले कपडे विक्रीसाठी ठेवलेले दिसून येतात, ज्यांना तरुणवर्गाकडून अधिक पसंती दिली जाते. अंगभर ॐ नम: शिवाय। हा मंत्रजप लिहिलेले सदरे परिधान करण्याची आता जणू फॅशनच येत चालली आहे. जीन्स पॅन्टवर अशा प्रकारचे सदरे घातलेले तरुण हल्ली सर्वत्र पाहायला मिळतात. 'ॐ नम: शिवाय।' हा भगवान शिवाचा मंत्रजप असून याच्या नियमित स्मरणाने शिव प्रसन्न होऊन आपली मनोकामना पूर्ण करतो असे म्हटले जाते. यामध्ये ओम हा बीजमंत्र असल्याने या मंत्रात शक्तीही तेव्हढ्या प्रमाणात सामावलेली असते. त्यामुळे तो श्रद्धेने स्मरावा असे धर्मशास्त्र सांगते. धर्मशास्त्रानुसार ज्या ठिकाणी देवतेचे नाम अथवा प्रतिमा असते त्या ठिकाणी त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि त्या देवतेची शक्ती कार्यरत असते. ॐ नम: शिवाय सारख्या या शक्तिशाली मंत्राचा हल्ली कपड्यांवर होत असलेला सुमार वापर मनाला खटकणारा आहे. मंत्रजप छापलेले कपडे घालून आपण आवश्यक ती शुचिर्भूतता पाळतो का ? अशा प्रकारचे कपडे परिधान करून आपण कोणत्याही अपवित्र स्थळी जात असू, मद्यपान, धूम्रपान करत असू, मुक्तपणे वावरत असू तर तो प्रत्यक्ष शिवाचाच अवमान आहे. अंगाला येणाऱ्या घामामुळे घातलेल्या कपड्यांना दुर्गंध येऊ लागतो. असे कपडे अन्य कपड्यांसोबत धुतांनाही आपण विशेष काळजी घेत नाही. एकीकडे आपली शिवभक्ती दाखवण्यासाठी अशा प्रकारचे कपडे घालायचे आणि दुसरीकडे प्रत्यक्ष शिवाचाच अवमान करायचा अशाने शिवाची कृपा आपल्यावर होईल का ? भक्ती ही मनापासून करावी, त्यासाठी हिंदू धर्मात अनेक मार्ग सांगण्यात आले आहेत. अशा प्रकारे मंत्रजपाचे कपडे परिधान करून आपल्या भक्तीचा देखावा करू नये. अशा प्रकारचे कपडे तयार करून ते विक्रीसाठी ठेऊन व्यापारी वर्ग आपला व्यवसाय वाढवू पाहतात आणि आपल्यासारखे भगवान शिवाचे भक्त हे कपडे चढ्या दरात विकत घेतात. त्यामुळे भगवान शिवाचा मंत्रजप छापलेले कपडे विकत घेणे आणि ते परिधान टाळायला हवे. त्याऐवजी ॐ नमः शिवाय हा मंत्रजप श्रावणात अधिकाधिक करायला हवा. ज्यामुळे भगवान शिवांची अखंड कृपा आपल्यावर राहिल.



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई**
**मो.क्र. ९६६४५५९७८०**

# लोककल्याणकारी अहिल्याबाई होळकर



भारतात अनेक स्त्रीरत्नांनी जन्म घेतला. आपली कीर्ती जगभर पसरवली. पुराणातल्या स्त्रिया सोडल्या तर राजघराण्यातील अनेक स्त्रिया काही मुल्ये उराशी धरून न्यायासाठी, कर्तव्यासाठी हातात समशेरी घेऊन राजकारणात सहभागी झाल्या. त्यात राजमाता जिजाऊ, महाराणी ताराबाई, झाशीची राणी लक्ष्मीबाई, गौंड वीरांगना राणी दुर्गावती, सातवाहन देवी गौतमी अशी अनेक स्त्री रत्ने होऊन गेली. पण यासर्वांमध्ये अहिल्याबाई होळकर यांचे स्थान आगळेच.

अहिल्याबाई म्हटले की आपल्या डोळ्यासमोर केवळ मंदिरे बांधणारी, दान दक्षिणा देणारी, पुजापाठ करणारी धार्मिक स्त्री अशीच प्रतिमा उभी राहते. त्यामुळे त्यांनी केलेले पुरोगामी कार्य नेहमीच उपेक्षित राहीले. अहिल्याबाई होळकरांनी अनेक लोककल्याणकारी कामे केली. त्यांनी अनेक मंदिरांचे जिर्णोद्धार केलेत. पण सोबतच त्यांनी तलाव बांधले, धर्मशाळा बांधल्या, अनेक घाट बांधले. अस्पृश्यता उच्चाटन, सर्वधर्म समभाव, हुंडा पद्धतीचे उच्चाटन, अनिष्ट रूढी परंपरा चालीरितींचा बिमोड असे केलेले पुरोगामी कार्य मात्र उपेक्षित राहिले. लोकमाता अहिल्याबाई होळकर ह्या उत्तुंग व्यक्तिमत्वाची, महापराक्रमी, लोककल्याणकारी विचारांची स्त्री होती. त्या मुत्सद्दी व बुद्धिमान होत्या.

अहिल्याबाईंचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहिल्यानगर (पूर्वीचे अहमदनगर) जिल्हयातील चोंडी या छोटयाशा खेडयात धनगर जातीत माणकोजी शिंदे व सुशिलादेवी या दांपत्याच्या पोटी झाला. त्याकाळात स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहिण्यावाचण्यास शिकवले. पुढे माळवा प्रांताचे सुभेदार मल्हारराव होळकर पुण्याला जात असतांना चौंडी गावी मुक्कामी होते. तेथे त्यांनी मंदिरात अहिल्याबाईंना पाहिले. तिच्या हजरजबाबी व चुणचुणीत स्वभावाला पाहून मल्हाररावांनी आपल्या मुलाच्या विवाहासाठी आपल्याच जातीतील शिंदे कुटुंबाकडे विचारणा केली. पुढे मल्हारराव यांचे पुत्र खंडेराव यांच्याशी अहिल्याबाईंचा विवाह वयाच्या आठव्या वर्षीच २० मे १७३३ रोजी झाला. आपला पुत्र खंडेराव व्यसनाधीन असून राज्यकारभार समर्थपणे सांभाळू शकणार नाही हे ध्यानी आल्यावर मल्हाररावांनी अहिल्याबाईंना राजकारणाचे चौफेर शिक्षण दिले. अहिल्याबाईंनी मल्हाररावांकडून घोडयावर बसणे, तलवार चालविणे, दांडपट्टा खेळणे याचे प्रशिक्षण घेतले. पुढे अहिल्याबाईंना मालेराव व मुक्ता अशी दोन अपत्ये झाली. इ.स. १७५४ मध्ये जाटांबरोबर कुंभेरीच्या लढाईत पती खंडेराव यांचा मृत्यु झाला. खंडेरावांचा मृत्यू हा अहिल्याबाईंवरच नाही तर मल्हारराव आणि त्यांच्या पत्नी गौतमाबाईंवर सुद्धा मोठा आघात होता. त्याकाळी सती जाण्याची अनिष्ठ प्रथा अस्तित्वात होती. अहिल्याबाईही सती जायला तयार झाल्या. पण सासरे सुभेदार मल्हारराव होळकरांनी त्यांना सती जाऊ दिलं नाही. संपुर्ण भारतभर दरारा निर्माण करणा–या मल्हाररावांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्याबाई न्यायनीती, युद्धकौशल्य, प्रशासन आदी बाबतीत परिपक्व होत होत्या. इ.स. १७६६ मध्ये सुभेदार मल्हारराव होळकर मरण पावल्यानंतर राज्याची धुरा अहिल्याबाईंनी आपल्या खांदयावर घेतली. व २८ वर्ष ती समर्थपणे चालवली. अनेक परीने राज्य संपन्न केले.

अहिल्याबाई लोककल्याणकारी कामे करत राहीली. वास्तुशिल्प व बांधकाम केल्यामुळे कारागिरांची कला जोपासून संकृतीचा वारसा तर जपलाच पण त्याच बरोबर गोरगरीब जनतेच्या हाताला काम मिळवून दिले. लोकमाता अहिल्यादेवींनी आपले संपुर्ण आयुष्य या कार्यासाठी वेचले. कामे करतांना त्यांनी प्रदेशाची मर्यादा न घालता संपुर्ण भारतात कार्य केले आहे. अनेक ठिकाणी त्यांनी विहीरी, तलाव, कुंड, व घाट बांधले. रस्ते व पुल निर्माण केले. लोककल्याणाची कामे त्या खाजगी तिजोरीतून करत. अहिल्याबाईंनी खासगी आणि सरकारी तिजोरीचे हिशेब वेगळे ठेवले होते. त्यांनी रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. अहिल्यादेवींच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याच्या मंजुरीस नकार दिला, तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तकविधानाचा कार्यक्रम स्वतः आयोजित करून रीतसर कपडे व दागिन्यांचा आहेर दिला. अहिल्यादेवींनी संगीत, कला व उद्योग यांना कायम आश्रय दिला. महाराष्ट्रातील प्रसिद्ध मराठी कवी मोरोपंत व शाहीर अनंत फंदी यांना अहिल्याबाईंनी आश्रय दिला.

अहिल्याबाई होळकर न्यायप्रिय होत्या. सर्वांना समान न्याय हा त्यांचा बाणा होता. त्यांच्या संस्थानचा सुभेदार तुकोजीबाबा होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्याला तुरुंगात डांबले. यावरून सर्वांसाठी सारखा न्याय त्यांनी ठेवल्याचे दिसते. राज्यात धुमाकुळ घालणा–या दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्यासाठी अहिल्याबाईंनी आपली मुलगी पणाला लावली. जो कुणी दरोडेखोरांचा बंदोबस्त करील त्याचा विवाह मुक्ताबाईशी करून दिला जाईल असे त्यांनी भर दरबारात जाहीर केले. तेव्हा यशवंतराव फणसे या वीराने दरोडेखोरांचा यशस्वीपणे नायनाट करून पण जिंकला. तेव्हा अहिल्याबाईंनी त्याची जात, धर्म, घराणे काहीही न बघता त्याच्याशी आपल्या मुलीचा विवाह लावून दिला.

राघोबा पेशवा व गंगाधरपंत चंद्रचुड हे निर्माण झालेल्या परिस्थितीचा गैरफायदा घेत होळकरांच्या राज्यावर आपल्या सैन्यानीशी चालून आले. तेव्हा अहिल्यादेवींनी न डगमगता पेशव्यांना संदेश पाठविला की, आता आपली गाठ रणांगणात पडेल. मी हरले तरी किर्ती करून जाईल. पण आपण स्त्रीकडून हरलात तर आपल्याला तोंड दाखवायला जागा उरणार नाही. म्हणून लढाईच्या भरीस न पडाल तर बरे. या राज्यावर ज्यांनी हुकुमत गाजवली त्यापैकी एकाची सुन, एकाची पत्नी, आणि एकाची मी आई आहे हे ध्यानात असु दया. मी अबला असे समजु नका. वेळ पडली तर हत्तीच्या पायी साखळीशी बांधून तुमचे स्वागत न केले तर होळकरांच्या सुनेचे नाव लावणार नाही अशा कडकडीत संदेशाने राघोबांचे अवसान पार गळाले. कुटील ईच्छा मनातच विरघळून गेली. व खालच्या मानेने आपल्या वाटेने परत गेले.

अहिल्यादेवी होळकर यांनी पती खंडेराव, सासरे मल्हारराव होळकर, पुत्र मालेराव, जावई यशवंतराव फणसे यांचा मृत्यू डोळ्याने बघितला. मुलगी मुक्ता जावायासोबत सती गेली. सर्व आप्तेष्टांची श्रृंखला काळाने एकामागोमाग एक हिरावून नेल्यानंतरही त्या खचल्या नाही. आपल्या रयतेवर पुत्रवत प्रेम करत राहील्या. अशी उत्तुंग व्यक्तिमत्वाची प्रकाशमय ज्योती, कुशल प्रशासक महापराक्रमी लोकमाता वयाच्या सत्तराव्या वर्षी १३ ऑगस्ट १७९५ या दिवशी अंतर्धान पावली. १३ ऑगस्ट स्मृतिदिनानिमित्त या लोकमातेस विनम्र अभिवादन.

**नितीन गो. धोरण**
**अकोट जि. अकोला. मो. नं. ९८५०३४३९८८**

# भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार विक्रम साराभाई



भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची उद्या म्हणजे १२ ऑगस्ट रोजी जयंती. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे देशातील मोठ्या नेत्यांचे त्यांच्या घरी उठबस असायची. त्यांच्या वडीलांनाही विक्रम साराभाई यांनी राजकारणात यावे किंवा उद्योगपती बनावे असे वाटत होते पण नियतीच्या मनात वेगळेच होते. विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वि नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिक आज मल्लिका हे दोन अपत्य झाली. १९४५ साली ते ब्रिटनला गेले तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लाँच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन ( चुंबकीय भूमध्य रेखा ) च्या अगदी जवळ होते पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप महत्वाची होती पण तेथील लोक ती जागा देण्यास तयार नव्हते शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली त्या जागेचे महत्व त्यांना समजावून सांगितले. विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले. भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लाँचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहण केले. त्यांनी या संशोधकांना सांगितले की देशाचे बजेट कमी असल्याने आम्ही तुम्हाला परदेशात आहेत त्याप्रमाणे वातानुकूलित प्रयोगशाळा आणि ऑफिस देऊ शकणार नाही, पण टेबल खुर्ची आणि एक कपाट नक्की देऊ. भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन भारतात परतले. त्यांनी तज्ज्ञ सांशीधकांची एक टीम बनवली त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे ( रॉकेट ) उड्डाण यशस्वी व्हावे यासाठी जीवाचे रान केले. दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविश्रांत मेहनतीचे फळ म्हणजे 'आर्यभट्ट' हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची ( इसरो) ची स्थापना झाली. आयआयएम अहमदाबाद च्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्षपदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली. आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ अब्दुल कलाम यांनीही आपल्या अग्निपंख या आत्मचरित्रात विक्रम साराभाई यांच्या नेतृत्व गुणाचे कौतूक केले आहे. डॉ अब्दुल कलाम विक्रम साराभाई यांच्या विषयी म्हणतात, 'ते स्वप्न पहायचे आणि ते प्रयक्षात उतरवण्यासाठी मेहनतही घ्यायचे. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी नेहमीच प्रेरणास्रोत ठरले आहे. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना वेगळी दृष्टी दिली. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत.' त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३० डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# राष्ट्रध्वजाचा सन्मान : प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य!

वाचक लिहितात

राष्ट्रध्वज हा आपल्या देशाच्या अस्मितेचे, अभिमानाचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहे. १५ ऑगस्ट (स्वातंत्र्यदिन) या दिवशी संपूर्ण देशभरात अत्यंत गौरवाने आणि अभिमानाने राष्ट्रध्वज फडकवला जातो. शूर स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग आणि बलिदानाचे स्मरण केले जाते. मात्र ,दुर्दैवाची बाब अशी की, अनेक वेळा या दिवशीच राष्ट्रध्वजाचा अपमान होताना दिसतो. बाजारात सहज मिळणारे प्लास्टिकचे छोटे झेंडे रस्त्याच्या कडेला, कचऱ्यात किंवा पायाखाली चिरडलेले आढळून येतात. काही वेळा नृत्य, नाटक किंवा इतर कार्यक्रमांमध्ये राष्ट्रध्वजाचा अयोग्य वापर होतो. केकवर राष्ट्रध्वजाचे चित्र कापणे, चेहऱ्यावर राष्ट्रध्वजाचे चित्र रंगवणे, हा देखील त्याचा अपमान आहे. तसेच स्वातंत्र्य सैनिकांनी, क्रांतिकारकांनी केलेल्या बलिदानाचा देखील अपमान आहे.

राष्ट्रध्वजाचा सन्मान राखणे ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे. रस्त्यावर राष्ट्रध्वज पडलेला दिसल्यास तो सन्मानपूर्वक उचलून योग्य ठिकाणी ठेवणे आवश्यक आहे. शाळा,महाविद्यालयात विद्यार्थ्यांना या संदर्भात प्रबोधन करणे हे आपले कर्तव्य आहे. तसेच सीमेवर तैनात असलेले सैनिक अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत देशाचे रक्षण करतात. त्यांच्या त्यागामुळे आपण सुरक्षित आहोत, याचे भान प्रत्येक भारतीयाने ठेवले पाहिजे.

राष्ट्रध्वज म्हणजे राष्ट्राचा आत्मा! त्याचा सन्मान राखणे, त्याचा अपमान टाळणे आणि इतरांनाही याची जाणीव करून देणे हीच खरी देशभक्ती आहे.

**सौ. प्रिया बागडदेव**
**छिंदवाडा**

## भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा तर्फे रक्षाबंधन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १० ऑगस्ट :** महाराष्ट्राचे माजी अर्थमंत्री आणि बल्लारपूर विधानसभेचे आमदार सुधीर भाऊ मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्षाच्या महिला कार्यकर्त्यांनी शहरात रक्षाबंधनाचा पवित्र सण साजरा केला. यावेळी भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या माजी जिल्हाध्यक्ष तथा माजी नगरसेविका सविता कांबळे, भारतीय जनता पक्षाच्या माजी महामंत्री किरण बुटले माजी नगरसेविका चंद्रकला सोयाम शीला चव्हाण माया उईके , आशा अबोजवार संगीता खांडेकर मोनीषा महातव सुनिता जयस्वाल यांच्यासह इतर भाजप महिला कार्यकर्त्यांनी शहरातील ऑटोचालक बांधवांना राखी बांधून त्यांचा सन्मान केला.

## चौगान येथे महसुल सप्ताह साजरा

**महासागर शहर प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. १० ऑगस्ट :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट दरम्यान गाव पातळी पासून ते जिल्हा पातळीपर्यंत महसूल सप्ताह साजरा करण्यात येत आहे. महसूल सप्ताहाच्या निमित्याने ब्रम्हपुरी तालुक्यातील चौगान येथे महसूल मंडळामार्फत दि . ४ ऑगस्टला महाराजस्व अभियानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी चौगान महसुल मंडळ परिसरातील शेतकरी व विद्यार्थी यांना जात प्रमाणपत्र, वय व अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, शेतजमिनीचे ७/१२, नमुना ८-अ, नकाशा, शिधापत्रिका , उत्पन्न अहवाल इत्यादी प्रमानपत्राचे वितरण करण्यात आले.

# लाडक्या बहिणींच्या पाठिशी सदैव खंबीरपणे उभा राहणार

## आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला निर्धार

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**मूल, दि. १० ऑगस्ट :** बल्लारपूर मतदारसंघातील माझ्या लाडक्या बहिणींच्या प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यावर मी पूर्ण शक्तीने पाठीशी उभा राहीन. त्यांच्या प्रगतीसाठी काम करताना कोणतीही कसर सोडणार नाही, असा ठाम निर्धार राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी रक्षाबंधन सोहळ्यात व्यक्त केला.



रामलीला सभागृह, मुल येथे भाजपा मुल तालुक्याच्या वतीने आयोजित रक्षाबंधन सोहळ्यात उपस्थित माजी जिल्हा परिषद अध्यक्षा संध्याताई गुरनुले, प्रदेश महामंत्री अल्काताई आत्राम, महीला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा वंदनाताई शेंडे, भाजपा तालुका अध्यक्ष चंदू मारगोनवार, भाजपा शहर अध्यक्ष प्रवीण मोहूर्ले, रत्नमाला भोयर, उषाताई शेंडे, किरण कापगते, भारतीताई लाकडे, वर्षाताई परचाके, वंदनाताई आगरकाटे, प्रभाकर भोयर, नंदू रणदिवे, मोतीलाल टहलीयानी, अविनाश जगताप, अजय गोगूलवार, चंद्रकांत आष्टनकर आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार मुनगंटीवार म्हणाले, रक्षाबंधनाचा पवित्र धागा हा नात्यांना अतूट बळ देणारा आणि प्रेम, विश्वास व नात्यांच्या अद्वितीय बंधाचा प्रतीक आहे. या पवित्र नात्याला जोपासण्यासाठी व बहिणींना योजनांचा लाभ थेट गावात मिळावा, यासाठी फिरते जनसंपर्क कार्यालय सुरू केले आहे. बल्लारपूर विधानसभेत मुली व महिलांसाठी एस.एन.डी.टी. विद्यापीठाचे उपकेंद्र, स्व. सुषमा स्वराज कौशल्य विकास केंद्र स्थापन करून शिक्षण व कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध केल्या आहेत.

चंद्रपूर येथील फ्लाईंग क्लबमध्ये विद्यार्थिनींसाठी शैक्षणिक आरक्षणाची सुविधा, संजय गांधी व श्रावणबाळ योजनेचा लाभ, तसेच आरोग्य शिबिरांद्वारे महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली. यावेळी मोठ्या संख्येने बहिणींनी राखी बांधून आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्याप्रती आपुलकीचा मान व्यक्त केला.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने शूरवी महाविद्यालय, मुल येथे राखी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थिनींनी कुशल हस्त कौशल्यातून साकारलेल्या सुंदर राख्या स्नेहाने बांधत रक्षाबंधनाच्या नात्याला अलौकिक असा गौरव बहाल केला असल्याचे यावेळी आमदार मुनगंटीवार यांनी नमूद केले.

# घुग्घुस शहरात महाविकास आघाडी तर्फे विश्व आदिवासी दिना निमित्त भोजनदान



**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. १० ऑगस्ट :** जागतिक विश्व आदिवासी दिनानिमित्त दि.९ ऑगष्ट २०२५ शनिवार रोजी आदिवासी समाजाकडून भव्य दिव्य गोंडी संस्कृतीत नाचत, गाजत रॅली काढण्यात आली.

रॅलीची सुरुवात अमराई वार्डातुन सुरुवात झाली या रॅलीच्या मार्गाने बहादे प्लॉट परिसरात जवळील महाविकास आघाडीच्या नेते, पदाधिकारी मोठ्या संख्येत उपस्थित द्वारा भोजनदान व पिण्याच्या पाणीचे आयोजन करण्यात आले.

सर्वप्रथम भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस घुग्घुस पुलिस स्टेशन निरीक्षक प्रकाश राऊत यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाला हातभार लावण्याकरिता सामाजिक नागरिक व पत्रकार समाजसेवक सुद्धा सहभागी झाले.

याप्रसंगी शिवसेना( उ.बा.ठा) गटांचे वरिष्ठ नेते बालू चिकनकर, शहर अध्यक्ष चेतन (बंटी) घोरपडे, अमित बोरकर, हेमराज बावणे, चेतन बोबडे, गणेश उईके, राष्ट्रवादीचे शरद कुमार, काँग्रेस पक्षाचे राजकुमार वर्मा, विक्रम गोगला, समाजसेवक मारुती जुमनाके, पत्रकार बंधू प्रणय कुमार बंडी आणि साहिल सय्यद, अष्टविनायक बहुउद्देशीय संस्थेचे सचिव धीरज ढोके, आकाश गोरघाटे, सुमेध पाटील, धोबी समाज अध्यक्ष सचिन क्षीरसागर, योगेश पाझारे, अमोल बोबडे, खुशाल, प्रफुल, राहुल आदी उपस्थित होते.

# स्पर्धेत राहून यश मिळवा - अरविंद सांदेकर

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**नागभीड, दि. १० ऑगस्ट :** जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून माना, जमातीतील गुणवंतांचा सत्कार, माना जमात मंडळ मुंबई शाखा नागभीडचे वतीने जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून नागभीड तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुण गौरव सोहळा ९ ऑगस्ट रोजी कर्मवीर विद्यालय नागभीड येथे पार पडला.



कार्यक्रमाचे उद्घाटन माजी प्राचार्य अरविंद सोनवणे यांचे हस्ते करण्यात आले यावेळी अध्यक्ष प्रा उमाजी हिरे माजी नगराध्यक्ष यांची उपस्थिती होती. विशेष अतिथी मंडळाचे सचिव मधुकर ढोक, प्रा सुधाकर श्रीरामे समन्वय समिती सदस्य, डॉ राकेश दडमल, ग्रामीण रुग्णालय चिमूर, शंकरराव, दडमल, गिरीधर नन्नावरे, प्रा गोविंद चौधरी, प्रा बाबुराव बारेकर गणपतराव रणदिवे यांची उपस्थिती होती. नागभीड येथे तालुक्यातील १०,१२ वी आणि व्यावसायिक अभ्यासक्रम अभ्यास करणाऱ्या पदवीधर गुणवंतांचा सत्कार करण्यात आला यावेळी समाजातील गुणवंतांनी आपले उदिष्ट ठेऊन यशाचे शिखर गाठले पाहिजे. पालकांनी आपल्या मुलाचे ध्येय काय आहे याचा शोध आणि त्याचा विचार करून त्या दिशेने पावले टाकताना आवडीने ते तो यश मिळवू शेकेल मात्र जी बाब त्याचे मनाविरुद्ध घडते तेव्हा तो यश मिळवून घेताना त्याची मनस्थिती सकारात्मक नसते यामुळे विद्यार्थाला त्याची काय करायचे आहे हे ठरवू द्या आणि त्याला मार्गदर्शन करा तरच यश ठरूशकते. आजकाल प्रत्येक पालकाची इच्छा माझा मुलगा डॉक्टर, अभियंता वकील व्हावा आणि आपले नावलौकिक वाढवावे असे वाटत असले तरी अनेक अभ्यासक्रम असे आहेत की तो या व्यावसायिक अभ्यासक्रमपेक्षा वेगळे शिकून पैसा मिळवू शकतो मात्र सध्या स्पर्धेच्या काळात माझा मुलगा मोठा होत असताना त्याचे मनाविरुद्ध होणार नाही असे मला वाटते यामुळे पालक आणि विद्यार्थी यांचे मार्गदर्शन सकारात्मक असावे असे समाज सेवक अरविंद सांदेकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे उद्घाटक प्रा अरविंद सोनवणे यांनी या देशातील समाज सुधारक आणि थोर व्यक्ती यांनी देशाला मोठे होताना शिक्षण हे महत्वाचे माध्यम आहे असे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले. तसेच या देशात असणाऱ्या प्रत्येकाला सामाजिक समता मिळावी या करिता जे संविधानाने जो देश चालतो त्यामुळे शिक्षण घेणे हे त्याचे कर्तव्य आहे. शिक्षण हे मनात परिवर्तन घडवून आणते त्यामुळे तो आपले जीवन बदलवू शकतो यामुळे शिक्षण घ्या संघटित व्हा आणि संघर्ष करा या युक्तीचा वापर करून गुणवंत व्हा आणि समाजाचा स्वतःचा आणि देशाचा विकास करावा असे आवाहन अरविंद सोनवणे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा उमाजी हिरे यांनी समाजातील गुणवंतांनी आपले उदिष्ट ठेऊन यश मिळवावे त्यासाठी समाज मंडळ किंवा अन्य मदत करण्यासाठी मंडळ आपले पाठीशी आहे. यावेळी डॉक्टर धारने, डॉ नन्नावरे यांचे पालक यांचा सत्कार करण्यात आला तसेच अन्य पदवीधर यांचाही सत्कार करण्यात आला यावेळी मंडळाचे अध्यक्ष मनोहर धारने, सचिव निरंजन गजभे आणि खजिनदार दडमल सर आणि त्याचे सहकारी यांनी सहकार्य केले यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक निरंजन गजभे, संचालन श्रीरंग गजभे, रंजना नन्नावरे मंगला ढोक, यांनी केले तर आभार प्रदर्शन मधुकर ढोक यांनी केले यावेळी गुणवंत आणि समाज बांधव उपस्थित होते.

# स्वतः करिता जगताना इतरांसाठीही जगता आले पाहिजे : योगेश डोंगरवार

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**वरोरा, दि. १० ऑगस्ट :** स्वतःसाठी व कुटुंबासाठी सर्वजण जगत असतात, परंतु स्वतःसाठी आणि कुटुंबासाठी जगताना समाजातील दुःखी व पीडित अशांसाठी ही जगता आले पाहिजे यातच मानवी जीवनाचे खरे सार आहे असे प्रतिपादन रोटरी क्लब वरोराचे अध्यक्ष योगेश डोंगरवार यांनी केले.




रोटरी क्लबच्या वतीने आनंदवनातील मूकबधिर विद्यालयात रविवार दि. १० ऑगस्ट रोजी आयोजित रक्षाबंधन कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मूकबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय भसारकर तर प्रमुख अतिथी म्हणून आनंदवन ग्रामपंचायतचे उपसरपंच शौकत अली कॉर्डिनेटर साबिया शेख ,रोटरी क्लबचे सचिव राहुल पावडे ,दादा जयस्वाल ,डॉ. विवेक तेला , अमित लाहोटी, डॉ. राहुल शेंद्रे ,बंडू देऊळकर ,अमित नहार , सचिन जीवतोडे, अभिजीत बोथले यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सदर कार्यक्रमात मूकबधिर विद्यालयातील वय वर्ष ६ पासून तर वय वर्ष १४ पर्यंत शिक्षण घेत असलेल्या मुलींकडून आयोजक रोटरी क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी राखी बांधून घेतली आणि मुला-मुलींना गोड पदार्थ व भेट दिली.

# प्रा. सतिश खोब्रागडे यांना अर्थशास्त्र विषयात आचार्य पदवी

**महासागर प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. १० ऑगस्ट :** महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालय तळोधी (बा.)येथे कार्यरत प्रा. सतिश शामराव खोब्रागडे यांना गोंडवाना विद्यापीठ. गडचिरोली येथील मानवविज्ञान विद्याशाखेतील अर्थशास्त्र या विषयात आचार्य पदवी बहाल करण्यात आली.

डॉ . बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, ब्रम्हपुरी अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. राजेश कांबळे यांच्या मार्गदर्शनात प्रा. सतिश खोब्रागडे यांनी 'गडचिरोली जिल्ह्यातील रमाई आवास योजनेचे अनुसूचित जातीच्या विकासात योगदान' (कालावधी २०१०-२०११ ते २०१९-२०२०) या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले.



माझ्या यशात माझे मार्गदर्शक प्रा. राजेश कांबळे , वडील शामराव मोतिराम खोब्रागडे, आई बेबीनंदा शामराव खोब्रागडे, माझा भाऊ व वहिनी सैलेश खोब्रागडे, मिनाक्षी खोब्रागडे, माझ्या ताई सुवर्णा राहुल खोब्रागडे, सविता खोब्रागडे माझ्या पुतण्या स्मित शैलेश खोब्रागडे, शौर्य शैलेश खोब्रागडे व माझ्या मित्र परिवाराचा मोलाचा वाटा आहे. त्याबद्दल प्रा. सतिश खोब्रागडे यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

# जुन्या बस स्थानकावरील २०० वर्षे जुने कडुनिंबाचे झाड अचानक कोसळले, मोठा अनर्थ टळला

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. १० ऑगस्ट :** शहरातील जुना बस स्थानक परिसरातील २०० वर्षापूर्वीचे जुने जीर्ण झालेले व मुख्य रहदारीच्या ठिकाणी असलेले कडुनिंबाचे झाड अचानक कोसळले. परिसरातील नागरिकांच्या सतर्कतेने व महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीने लागलीच विद्युत पुरवठा खंडित केल्याने मोठा अनर्थ टळला. ही घटना शनिवार दिनांक ९ ऑगस्टला दुपारी २ वाजताच्या सुमारास घडली.



दररोज प्रमाणे फळ विक्रेता नरेश नागपुरे यांनी जुना बस स्थानक परिसरातील. व २०० वर्षे जुन्या कडूलिंबाच्या झाडाखाली आपला फळ व भाजीपाल्याचा व्यवसाय सुरू केला. त्याला अचानक २०० वर्ष जुने कडुनिंबाचे झाड हळूहळू आवाज करून झुकत असल्याची चाहूल लागली. तेव्हा त्याने आपला फळाचा हाथ ठेला दूर करून मुख्य रहदारीच्या रस्त्यावरील ये-जा करणाऱ्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा करीत होता.

लागलीच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला सूचना करून विद्युत खंडित केली. वीज कर्मचारी याकडे लक्ष देऊन होते काही क्षणातच सदर झाड कोसळले. दरम्यान कोणी व कोणतेही वाहन न गेल्याने मोठा अनर्थ टळला. या घटनेची माहिती नगरपरिषदेला व पोलिसांना मिळताच त्याठिकाणी जमावास पांगऊन पोलिसांनी वाहतूक सुरळीत सुरू केली.तर नगरपालिकेने तात्काळ झाड तोड पथकास बोलावून झाडाचे विल्हेवाट लावली.

# स्व. कालीदास अहीर जयंतीदिनी १२ ऑगस्ट रोजी रक्तदान शिबीराचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १० ऑगस्ट :** कमल स्पोर्टींग क्लब या सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्राला वाहून घेणाऱ्या प्रतिथयश संस्थेचे संस्थापक व युवकांच्या प्रगतीकरिता धडपडणारे नेतृत्व स्व. कालिदास गं. अहीर यांच्या जयंती स्मृतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांच्या प्रेरक मार्गदर्शनात कमल स्पोर्टींग क्लबचे जिल्हाध्यक्ष रघुवीर अहीर यांच्या विशेष पुढाकाराने अहीर परिवार व मित्र मंडळींच्या वतीने चंद्रपूर येथील जैन भवन सभागृह, पठाणपुरा रोड, चंद्रपूर येथे सकाळी ०९.०० वाजेपासून होत असलेल्या या रक्तदान शिबिराच्या अध्यक्षस्थानी ओबीसी आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष हंसराज अहीर, तर प्रमुख अतिथी म्हणून आमदार किशोर जोरगेवार यांची उपस्थिती लाभणार आहे.

सदर रक्तदान शिबिर चंद्रपूर मेडीकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. कांबळे, सामान्य रूग्णालयाचे शल्यचिकित्सक डॉ. चिंचोले, डॉ. राजु सैनानी, डॉ. एम.जे. खान, डॉ. नरेंद्र कोलते, डॉ. किर्तीवर्धन दिक्षीत, लाईफलाईन रक्तपेढी नागपुरचे डॉ. वरभे, मधुसूदन रूंगठा, दामोदर मंत्री व शहरातील अनेक मान्यवर अतिथींच्या उपस्थितीमध्ये संपन्न होत आहे. या रक्तदान शिबीरास भाजप, भाजयुमो, ओबीसी मोर्चा व शहरातील युवक, युवतींनी बहुसंख्येने उपस्थित राहून रक्तदानासारख्या राष्ट्रीय कार्यात योगदान द्यावे असे आवाहन कमल स्पोर्टींग क्लबचे जिल्हाध्यक्ष रघुवीर अहीर व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# विधीमंडळ गटनेते, आ.विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते कॉंग्रेस पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. १० ऑगस्ट :** ब्रम्हपुरी तालुक्यातील कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या पक्षांतर्गत विविध संघटनात्मक पदांवर नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

या सर्व पदाधिकाऱ्यांना महाराष्ट्र विधीमंडळ कॉंग्रेस गटनेते तथा ब्रम्हपूरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले आहेत.

यामध्ये चंद्रपूर जिल्हा कॉंग्रेस कमीटीच्या सचिवपदी वासु सोंदरकर, जिल्हा सहसचिवपदी ॲड.आशिष गोंडाणे, जिल्हा सहसचिव पदी मोहम्मद गाजी पटेल तर ब्रम्हपूरी शहर सरचिटणीसपदी पराग बनपुरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



सदर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे राज्याचे विरोधी माजी पक्षनेता, विधीमंडळ कॉंग्रेस गटनेते, आमदार विजय वडेट्टीवार यांनी शुभेच्छा देत अभिनंदन केले आहे. कॉंग्रेस पक्षाचे विचार व ध्येयधोरणे जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी जोमाने कार्य करावे असे आवाहन नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करतांना तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके यांनी केले आहे.

नियुक्तीपत्र प्रदान करतांना तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष हितेंद्र राऊत, माजी जि.प.सदस्य प्रमोद चिमुरकर, माजी नगरसेवक मनोज कावळे, शहर कॉंग्रेस कार्याध्यक्ष सुधाकर पोपटे, अनुसूचित जाती सेलचे शहराध्यक्ष मुन्ना रामटेके, युवक कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष रवी पारधी, वकार खान, ईनायत खॉं पठाण, ईकबाल जेसानी, प्रकाश खोब्रागडे, लक्ष्मण जिभकाटे, रवि पवार यांसह अकॉंग्रेस पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# खडसंगीत शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. १० ऑगस्ट :** महसूल विभागामार्फत १ ऑगस्ट ते ७ ऑगस्टच्या दरम्यान महसूल सप्ताह साजरा करण्यात येत असून, चिमूर तालुक्यात तहसील कार्यालयाच्या वतीने या कालावधीत महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले.



महसूल सप्ताह सांगता समारंभाच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे आयोजन खडसंगी येथील माँ मानिकादेवी सभागृह येथे करण्यात आले. हा समारंभ उपविभागीय अधिकारी किशोर घाडगे यांच्या मार्गदर्शनात, तर तहसीलदार श्रीधर राजमाने यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला.

महाराजस्व अभियानात आधार कार्ड, संजय गांधी योजना ओळखपत्र, अधिवास, जात, उत्पन्न, राशन कार्ड, विविध दाखले, इतर विभागांचे लाभार्थी यांना शासकीय योजना विषयक लाभाचे वाटप करण्यात आले, तसेच आरोग्य विभागाकडून आरोग्य तपासणी करण्यात आली. भूमिअभिलेख विभागाकडून सनद वाटप करण्यात आले. तालुका कृषी विभागाकडून पी.एम. किसान लाभार्थी आणि इतर प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. प्रकल्प अधिकारी यांच्याकडून शिलाई मशिन आणि वैयक्तिक लाभाच्या योजनेचा लाभ देऊन प्रमाणपत्र देण्यात आले. पंचायत समिती यांच्याकडून घरकूल लाभार्थी यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले, तसेच ग्रामपंचायत खडसंगीकडून दाखल्यांचे वितरण करण्यात आले. प्रशासन आणि जनता यातील दरी कमी करून शासन आपल्या दारी ही संकल्पना जनतेपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

यावेळी अजहर शेख, तालुका कृषी अधिकारी एन पी पुजारी, प स चिमूर चे प्रभारी गट विकास अधिकारी अशोक शामकुळे, सहाय्यक पक्ल्प अधिकारी मंच्छिंद . डुले, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय चिमूरचे कावळे व इतर सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक

मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)



# भक्तिमार्ग

**अबला, अज्ञानी, अजाण महिलांच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्यावरच असल्याच्या पुरुषी मानसिकतेने काही सणांच्या माध्यमातून हे दुय्यमत्व महिलांवर लादलं. राखीपौर्णिमा हा असाच एक सण. यात बहीण-भावातील नाजूक बंध दृढ करण्याचं उचित प्रयोजन असलं तरी केवळ भावनेच बहिणीचं संरक्षण करावं ही शिकवण कालबाह्य झाली आहे. त्याऐवजी दोघांनीही एकमेकांची काळजी घ्यावी या उपदेशासह हा सण साजरा व्हावा.**



## रक्षाबंधनाच्या निमित्ताने...

भावाबहिणीचे हे नाजूक बंध आपल्या जीवनपद्धतीचा हळवा कोपरा आहेत. विविध सणांच्या निमित्ताने या नात्याला उजाळा देण्याचा प्रयत्न होतो. राखी पौर्णिमा हा देखील असाच एक सण. महिलांची अबला ही प्रतिमा समाजासमोर होती तेव्हा तिच्या संरक्षणाची जबाबदारी कोण्या पोलादी हातात असावी, या संरक्षणाचं भान त्या हातांना रहावं या भावनेने कदाचित हातावर राखी बांधणाऱ्या या सणाचं प्रयोजन केलेलं असावं. राखी पौर्णिमेच्या दिवशी बहीण भावाच्या हातावर राखी बांधते. औक्षण करुन त्याचं शुभ चिंतते. गोडाधोडाच्या जेवणाने हसता-खेळता हा सण पार पाडतो. वर्षानुवर्षं याच उत्साहात हा दिवस साजरा होत आला आहे. काळानुरुप राखीचे प्रकार बदलले. मोराची, मण्यांची, स्पंजची, गोंड्यांची, चंदेरी झिरमिळ्या असणारी असा प्रवास करत आजची राखी सोन्या-चांदीपर्यंत येऊन पोहोचली आहे. नाजूक रेशीमबंधांची जागा छोट्या साखळीने घेतली आहे. प्रत्यक्ष राखी बांधणं शक्य नसलं तर एकमेकांना शुभेच्छा देण्यासाठी व्हर्च्युअल वर्ल्डही आज सिद्ध आहे. त्यासाठी पोस्टाचं माध्यम वापरण्याची गरज आज अभावानेच जाणवते. पण या बदलत्या वातावरणात राखी पौर्णिमेचा उत्साह तसूभरही कमी झालेला नाही. या सणाच्या निमित्ताने बदलत्या स्त्रीविषयक परिस्थितीचा मात्र नव्याने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

पूर्वी स्त्री घराच्या चार भिंतीमध्ये कोंडलेली होती. तिच्या कार्यकक्षा तेवढ्यापुरत्या सीमित होत्या. शारीरिक ताकदीबाबत पुरुषांपेक्षा कमकुवत असणाऱ्या स्त्रीच्या मनाची शक्ती, इच्छाशक्ती, ज्ञानग्रहणाची शक्ती समाजाने ओळखली नव्हती. अशा परिस्थितीत तिच्या भरणपोषणाचा, संरक्षणाचा सगळा भार पुरुषांनी आपल्या खांद्यावर घेतला. पुरुष, मग तो कोणत्याही नात्याने तिच्या आयुष्यात आलेला असो; त्याला ही स्वत:ची जबाबदारी असल्याची जाणीव अगदी लहानपणापासून देण्यात येऊ लागली. म्हणूनच आपल्यापेक्षा पाच-सात वर्षाने मोठ्या असणाऱ्या बहिणीची जबाबदारी त्या लहानग्या जीवावर देताना समाजाला काही चुकीचं वाटलं नाही. याच संस्कारात वाढलेला तो जीव मोठेपणी समजुतीच्या या दबावाखालीच बहिणीची जबाबदारी सांभाळू लागला. अशा प्रकारे जबाबदारीचं ओझं वाढतं तेव्हा अधिकाराची वाणी बुलंद होऊ लागते. वर्चस्व गाजवण्याची प्रवृत्ती वाढते. आपलाच शब्द प्रमाण असल्याचा आग्रह धरला जातो आणि बहिणीवर नानाविध नियमांचे अंकुश लावण्याची वृत्ती उफाळून येते. काही वर्षांपूर्वीचा काळ लक्षात घेतला तर घरातल्या मोठ्या पुरुषांच्या वर्चस्वाबरोबरच समवयस्क भावांचा जाच अथवा धाक असणाऱ्या महिलांची संख्या किती मोठी याचा सहज अंदाज येतो. पण आता परिस्थिती बदलली आहे. त्यामुळेच राखी पौर्णिमेच्या निमित्ताने बांधल्या जाणाऱ्या राखीचं भावनेला बंधन वाटता कामा नये की कोण्या बहिणीला ही संरक्षणाची याचना असल्याची बोच वाटू नये. बंधनात राहण्याची सक्ती करणारं हे कोणतंही गठबंधन नाही तर मनाचे धागे जोडणारा सुरेख क्षण आहे इतकंच.



एखाद्याला संरक्षणाची गरज असल्याचं सूचित केलं जातं तेव्हा त्याची निर्बलता, अगतिकता, असामर्थ्य एक प्रकारे अधोरेखित होत असतं. किंबहुना, हे गृहित धरुनच कोणावर तरी ही जबाबदारी सोपवली जाते. मात्र आज परिस्थिती वेगळी आहे. आजची स्त्री पुरुषांइतकीच, किंबहुना त्यांच्यापेक्षा काकणभर जास्तच सशक्त आहे. तिची ही ताकद अनेक प्रकारे आणि अनेक पातळ्यांवर सिद्ध झाली आहे. पूर्वीची वड-पिंपळाच्या तुळशीच्या प्रदक्षिणांमध्ये अडकलेली स्त्री आज पृथ्वीला प्रदक्षिणा घालणाऱ्या अंतरिक्ष केंद्रामध्ये राहून आली आहे. आधी उंबराही न ओलांडलेल्या महिलेने आज अत्यंत आत्मविश्वासाने स्पेस वॉक केला आहे. भारताच्या अंतरिक्ष संशोधक गटामध्ये एका स्त्रीची निर्णायक भूमिका समस्त भारतीयांची मान उंचावून जाते. यापूर्वी तिने आकाशाला गवसणी घालत विमान चालवलं आहेच. आता तर शत्रूचा नि:पात करणाऱ्या लढाऊ विमानांच्या सारथ्यगटाचाही ती एक भाग आहे. ती कमांडो बनून अतिरेक्यांना कंठस्नान घालत आहे. वन्यजीवांचं रक्षण आणि संवर्धन करण्यासाठी घनदाट जंगलातून गस्त घालत आहे. नक्षलग्रस्त भागांमधील गस्ती पथकामध्ये तिचा सहभाग आहे. आज ती विविध वाहनांची चालक आहे, वाहक आहे आणि मालकही आहे. शिक्षण, आरोग्य संशोधन, संवर्धन, हॉटेल मॅनेजमेंट, कला कौशल्य, पाकशास्त्र, सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट आदी क्षेत्रांमध्ये तिचा सहभाग उल्लेखनीय ठरतोय. इतकंच नव्हे, तर या आणि अशा क्षेत्रांमध्ये पुरुषांपेक्षा अधिक सरस ठरणारी तिची कामगिरी हा कौतुकाचा विषय आहे. उपजत चिकाटी, परिश्रम घेण्याची अपार क्षमता, परिस्थितीप्रमाणे जमवून घेण्याची लवचिकता, अफाट मनोबल, दुसऱ्याला जाणून घेण्याची नैसर्गिक प्रेरणा, स्वभावातील मार्दव आणि ममत्व अशा एक ना अनेक गुणांचा समुच्चय असणारी स्त्री आज कोणत्याच बाबतीत पुरुषांवर अवलंबून नाही. म्हणूनच जवळपास प्रत्येक क्षेत्रातील आस्थापनांमध्ये वरिष्ठ पदांवर महिला राज पहायला मिळतं. थिंक टँकमध्ये महिलांचा वरचष्मा बघायला मिळतो. स्पर्धा परीक्षांच्या यशस्वितांच्या यादीत युवतींच्या नावाची गणती अधिक आढळते. त्यामुळेच आता त्यांना कोणी संरक्षण देण्याची गरज नाही. त्या स्वत:चंच नव्हे तर इतरांच्या संरक्षणासाठीही सिद्ध आहेत.

भक्ती विशेष

आज खरी गरज आहे ती ज्या मनगटांवर राखी बांधली जाते त्या पुरुषांनी स्त्रीविषयक जाणिवा सुधारण्याची. तिचं समाजस्थान मान्य करण्याची आणि त्यानुसार वागणुकीत बदल करण्याची. स्त्रीवरील वाढत्या अत्याचारांच्या घटना अत्याचारी व्यक्तीच्या जाणिवा प्रगल्भ नसल्यामुळे घडतात. बंधू हे व्यक्तिसापेक्ष नातं आहे. मात्र बंधुत्व ही सर्वव्यापी संकल्पना आहे. ती आचरणात आणली तर परस्त्रीकडे उपभोग्य वस्तू म्हणून पाहण्याची हिंस्त्र आणि पाशवी वृत्ती कमी झाल्याशिवाय राहणार नाही. कारण एखाद्या मुलीवर पाशवी अत्याचार करतो तो कोणाचा तरी भाऊच असतो. आपल्या बायकोचा छळ करतो, तिला आत्महत्येला प्रवृत्त करतो तोही कोणाचा तरी भाऊच असतो. घरामध्ये बहिणीकडून राखी बांधून घेणारा भाऊ बाहेर असं कृत्य करतो तेव्हा त्याच्या अप्रगल्भ आणि अविकसित मानसिकतेचंच दर्शन घडतं. या एका कृत्यात एखाद्या महिलेचं संपूर्ण जीवन उद्ध्वस्त होतं. तिचं कुटुंब कोलमडतं. म्हणूनच जबाबदारी घ्यायची असेल तर भावाच्या नव्हे तर बंधुत्वाच्या जाणिवेने घ्यावी. आज या अर्थाने रक्षाबंधनाचं महत्त्व मुलांना पटवून द्यायला हवं. आज स्त्रियांना संरक्षणापेक्षा जास्त गरज आहे ती सन्मानाची. त्यांना घरात सन्मान मिळावा, समाजात सन्मान मिळावा, त्यांच्या गुणांचं मुक्त कंठानं कौतुक करावं, त्यांच्या क्षमतांचा स्वीकार करावा आणि त्यानुसार उचित स्थान मिळावं. आज त्यांना या सर्वाची गरज आहे. ही गरज पूर्ण झाली तरच त्या निर्भय मनाने आपल्या क्षमता आणि कौशल्याचा वापर करुन समाजासाठी सर्वोत्तम योगदान देऊ शकतील.

## लाभ शिवपूजनाचे...



श्रावण महिन्यात शंकराच्या पूजनाचं महत्त्व असतं. या महिन्यात शंकराची पूजा केल्याने कोणते लाभ होतात याविषयी...

* श्रावण महिन्यात शंकराच्या पिंडीतून इतर दिवसांच्या तुलनेत १०८ पटींनी जास्त ऊर्जा बाहेर पडते. श्रावण महिन्यातला सोमवार शिवपूजनाच्या दृष्टीने अत्यंत पवित्र मानला जातो.
* मनापासून आणि समर्पित भावनेने केलेल्या शिवपूजनामुळे ग्रहदोषांचा आणि त्यातही शनीदोषाचा वाईट प्रभाव दूर होऊ शकतो. श्रावणातल्या एखाद्या सोमवारी रूद्राभिषेक पूजा केल्याने मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्याचा लाभ होतो.
* श्रावणमासात उपवास आणि शिवपूजन केल्याने भक्ताच्या सगळ्या इच्छा-आकांक्षा पूर्ण होतात.
* शिवपूजनाने भक्तमंडळींचं शारीरिक आरोग्य सुधारतं. या काळात आरोग्यविषयक अनेक लाभ मिळतात.
* या दिवसात महामृत्यूंजय मंत्र तसंच ओम नम: शिवाय या मंत्राचा जप केल्याने अपमृत्यू आणि इतर संकटांपासून संरक्षण मिळतं. शंकराच्या पूजनाने मोक्षप्राप्तीचा मार्ग मोकळा होतो.
* श्रावणातल्या सोमवारी केलेल्या दानामुळे ज्योतिर्लिंगांच्या दर्शनाचं पुण्य मिळतं. श्रावणी सोमवारच्या व्रतामुळे भक्ताचं आणि त्याच्या कुटुंबियांचं आरोग्य सुधारतं. त्यांचं संकटांपासून रक्षण होतं.
* श्रावणमासाच्या काळात शिवतत्त्व अधिक प्रभावी असतं. शिवपूजन करून भाविक याचे लाभ मिळवू शकतात. ओम नम: शिवायचा मंत्र जपून या तत्त्वाला आकर्षित करता येईल.
* या काळात रूद्राक्ष परिधान केल्याने अधिक चांगला परिणाम साधला जातो. तसंच जप करण्यासाठी रूद्राक्ष माळेचा वापर केल्याचेही अनेक लाभ आहेत.

जाणून घ्या

## श्रावणातल्या कहाण्या...

श्रावण महिना साजरा करण्याच्या प्रथा, परंपरा, पद्धती काळानुरूप बदलल्या आहेत. श्रावणाशी संबंधित अनेक प्रथा-परंपरा महाराष्ट्रात आहेत. त्यापैकी एक म्हणजे श्रावणातल्या कहाण्या. श्रावणातल्या प्रत्येक वाराची, प्रत्येक सणाची कहाणी आपल्याकडे सांगितली जाते. **आटपाट नगर होतं** पासून सुरूवात होऊन **साठा उत्तराची कहाणी सुफळ संपूर्ण...** असा कहाण्यांचा शेवट असतो. या कहाण्या कोणी रचल्या, कोणी लिहिल्या हे अज्ञात असलं तरी ही परंपरा आजही टिकून आहे. महिलांनी एकत्र यावं, विचारांचं आदानप्रदान व्हावं, कहाणी सांगण्याच्या निमित्ताने एकमेकांशी संवाद साधला जावा, असा यामागचा उद्देश असावा. श्रावणातली व्रतवैकल्यं या कहाण्यांशिवाय पूर्णत्त्वास जात नाहीत.

श्रावणमासातल्या काही कहाण्यांमध्ये देवदेवतांचं महात्म्य वर्णन केलेलं असतं तर काहींमधून त्या काळच्या सामाजिक परिस्थितीचं वर्णन केल्याचं दिसून येतं. या कहाण्यांमधून विशिष्ट संदेश दिला आहे. हा संदेश आजच्या काळतही तितकाच लागू पडतो. कहाण्यांची रचना अत्यंत आकर्षक पद्धतीने करण्यात आली आहे. त्यातली वाक्यं लयबद्ध आहेत. कथांमध्ये आवर्तनं आहेत. या कहाण्या वाचल्यानंतर मनाला अनोखं समाधान लाभतं. या कहाण्या म्हणजे आपल्या परंपरांचं संचित आहे. श्रावणमासानिमित्ताने कपाटात दडलेली कहाण्यांची पुस्तकं बाहेर येतात. या कहाण्या सामूहिकपणे वाचल्या जातात. छोटी शहरं आणि गावांमध्ये आजही ही परंपरा टिकून आहे. शहरातल्या महिलाही या कहाण्या आवर्जुन वाचतात.

परंपरा




सोमवारची खुलभर दुधाची कहाणी सांगितली जाते. हंडे हंडे दूध ओतूनही न भरणारा गाभारा म्हातारीच्या वाटीभर दुधाने भरतो. आपल्या लेकरांबाळांचं, प्राणीमात्रांचं करून मगच परमेश्वराचा विचार करावा, त्याचं पूजन करावं, असा संदेश यातून देण्यात आला आहे. तर शुक्रवारच्या गरीब बहिणीच्या कहाणीतूनही आपण बरंच काही शिकू शकतो. काळ बदलला असला तरी गरीब-श्रीमंत ही दरी आजही कायम आहे. गरीबीचा आजही दुस्वास केला जातो. गरीब माणसं आजही अपमानीत होतात. किंमत माणसाची नाही तर त्याच्या संपत्तीची होत असते, हे या कहाणीतून जाणवतं. या कहाण्या म्हणजे लोकवाङ्मय. याची चिरंतन जपणूक व्हायला हवी. या कहाण्यांमधलं सार घेऊन पुढे जायला हवं. हा कहाण्यांमधली रंजकता, त्याचा गोडवा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. तरच पुढच्या अनेक पिढ्या या कहाण्यांचं श्रवण आनंदाने करतील.

## लक्षण रजोगुणांची...

दुसऱ्या दशकातल्या पाचव्या समासात समर्थ रामदास रजोगुण लक्षणांचं वर्णन करतात. ते म्हणतात की मुळी देह त्रिगुणाचा। सत्त्वरच तमाचा। त्यामध्यें सत्त्वाचा उत्तम गुण। ।१।। सत्त्वगुणे भगवतभक्ती रजोंगुणे पुनरावृत्ती। तमोगुणे अधोगती। पावती प्राणी।।२।। त्यांतहि शुद्ध आणि सबळ। तेहि बोलिजेति सकळ। शुद्ध तेचिं जे निर्मळ। सबळ बाधक जाणावें।।३।। शुद्धसबळाचे लक्षण। सावध परिचा विचक्षण। शुद्ध तो परमार्थी जाण। सबळ तो सांसारिक।।४।। तया संसारिकांची स्थिती। देहीं त्रिगुण वर्तती। येक येतां दोन्ही जाती। निघोनियां।। ५।।

याचा अर्थ असा की हा देहच मुळात तीन गुणांचा आहे. सत्त्व, रज आणि तम असे हे तीन गुण. सत्त्व हा त्यामधला उत्तम गुण. सत्त्वगुणामुळे भगवंतभक्तीची प्राप्ती होते. रजोगुणांमुळे पुनरावृत्ती होते तर तमोगुणांमुळे प्राण्यांना अधोगती प्राप्त होते. गुणांचे शुद्ध आणि सबळ असे दोन भेद आहेत. शुद्ध ते निर्मळ तर सबळ अशुद्ध आणि बाधक असते. शुद्ध आणि सबळ यांची लक्षणं मी सांगतो. ती सर्वांनी सावधपणे ऐकली पाहिजेत. शुद्ध गुण पारमार्थिक असतो तर सबळ गुण प्रापंचिक असतो. प्रापंचिक माणसाच्या देहात तिन्ही गुण वास करून असतात. त्याच्या देहात तिन्ही गुणांचे कार्य चालते. एक गुण वरचढ झाला की दुसरे दोन्ही क्षीण होतात.

यापुढे समर्थ रजोगुणांची लक्षणं वर्णन करतात. ती अशी की, माझें घर माझा संसार। देव कैंचा आणिला थोर। ऐसा करी जो निर्धार। तो रजोगुण।।८।। माता पिता आणि कांता। पुत्र सुना आणि दुहिता। इतुकियांची वाहे चिंता तो रजोगुण।।९।। बरें खावें बरे जेवावे। बरें ल्यावें बरें नेसावें। दुसऱ्याचें अभिषाळावें। तो रजोगुण।।१०।।



दासबोधातून...

रजोगुण वरचढ ठरला की मनुष्य माझे घर, माझा संसार, इथे थोर देव कोणता असे निर्धारपूर्वक बोलू लागतो. माता, पिता, मुलं सुना, नातवंडे यांचीच चिंता वाहतो. अशा माणसांची वृत्ती बरे खावे, बरे जेवावे, बरे ल्यावे, बरे नेसावे इतकीच असते असे नाही तर इतरांकडे असलेल्या वस्तूंची अभिलाषाही अशी माणसे बाळगतात. रजोगुणांची अशी अनेक लक्षणं आहेत. काळानुरूप या लक्षणांचा त्याग करून सत्त्व गुणांचा अंगिकार करावा, असं समर्थ सांगतात.

## का करावा शंखनाद?

हिंदू धर्मामध्ये शंखाला वेगळं महत्त्व आहे. देवपूजेआधी शंख-घंटेची पूजा केली जाते. शुभकार्यावेळी शंखनाद करण्याची परंपरा आपल्याकडे प्राचीन काळापासून बघायला मिळते. प्रत्येकाच्या देवघरामध्ये शंख असतोच, मात्र शंखाची निवड करताना काही बाबींची दखल घ्यायला हवी. कारण शंखाची अचूक पारख झाली तर आपल्या मनोकामना पूर्ण होऊ शकतात. घरामध्ये उचित शंख असेल तर नकारात्मक ऊर्जा नष्ट होते. घरामध्ये दररोज शंखनाद केल्यास सकारात्मक ऊर्जेचा मार्ग मोकळा होतो. शंखध्वनीमुळे वातावणातील सूक्ष्म जीवाणूंचा नाश होतो. शंखामध्ये पंचतत्त्वांना संतुलित करण्याची क्षमता असते. म्हणूनच घरात शंख ठेवावा. शंखामध्ये पाणी भरुन त्याचं नियमित सेवन केल्यास हृदय आणि श्वासासंबंधीचे विकार नष्ट होतात असं संशोधक सांगतात. म्हणजेच वैज्ञानिक दृष्टीने शंखाचं महत्त्व सिद्ध झालं आहे. हाच शंख जन्मकुंडलीतील काही दोष निवारणार्थही उपयुक्त सिद्ध होतो. उदाहरणार्थ जन्मकुंडलीमध्ये सूर्य नीचेचा असेल तर वाईट फळाची शक्यता असते. जन्मकुंडलीतील हा दोष दूर करण्यासाठी प्रत्येक रविवारी दक्षिणावर्ती शंखामध्ये जल भरुन सूर्याला अर्घ्य द्यावं. धनाचा अभाव असेल तर घरात विष्णूशंख ठेवावा. या शंखाचा आकार अर्धचंद्राकार असतो. त्यामुळे त्याला चंद्रशंख देखील म्हणतात. हा शंख घरात असल्यास लक्ष्मीची कृपा राहते.



भक्ती बोध

दक्षिणावर्ती शंख हा विशेष प्रकारचा शंख असतो. आकाशातील नक्षत्रमंडळामधील विशेष शुभ नक्षत्राच्या प्रभावाने समुद्रात या शंखाची उत्पत्ती होते. म्हणूनच या शंखाचा चमत्कारी प्रभाव दिसून येतो. मौल्यवान शंखामध्ये याचा नामोल्लेख करता येईल. दररोज शंखामध्ये पाणी भरावं आणि त्यासमोर श्री सूक्ताचं पठण करावं. नंतर हे जल घर, दुकान, ऑफिस अशा ठिकाणी शिंपडावं. यामुळे धनवृद्धी साधते.

## करु पिंपळाची पूजा

सध्या निसर्गाचा बहर अनुभवायला मिळत आहे. वृक्षलता नवतेजाने बहरल्या आहेत. असं असताना केवळ पावसाळ्यातच नव्हे तर सर्वकाळ बहारदार दिसणारा वृक्ष म्हणजे पिंपळ. आपल्या धर्मात पिंपळाचं आगळं स्थान आहे. हा वृक्ष आपल्यासाठी शुद्ध आणि पूजनीय आहे. विश्व वृक्ष, चैत्य वृक्ष आणि वासुदेव या नावानेही हा वृक्ष ओळखला जातो. हिंदू धर्मानुसार या वृक्षाच्या मुळांजवळ ब्रह्मदेवाचा वास असतो, मध्यामध्ये विष्णूंचा वास असतो तर अग्रभागी शिव विराजमान असतात. म्हणूनच पिंपळाला देवतासमान पूजलं जातं. बरेच भाविक नियमितपणे पिंपळाची पूजा करतात. पिंपळाला पाणी घालतात. यामुळे मनोकामनांची पूर्ती होते. शत्रूंचा नाश होतो. त्याचबरोबर धनधान्य, संपत्ती आणि संतानसुख मिळतं. या वृक्षाची पूजा ग्रहदोषांच्या निवारणार्थही केली जाते. हे दोष दूर करण्यासाठी अमावस्या आणि शनिवारी पिंपळाची पूजा करतात.



या पूजेमागे वैज्ञानिक कारणंदेखील आहेत. बहुसंख्य वृक्ष दिवसा ऑक्सिजनचं उत्सर्जन करतात आणि कार्बन डायऑक्साईडचं ग्रहण करतात. मात्र पिंपळ हा एकमेव असा वृक्ष आहे जो सदोदित ऑक्सिजनचं उत्सर्जन करत असतो. म्हणूनच या वृक्षाजवळ नेहमी शुद्ध वातावरण अनुभवायला मिळतं. साहजिकच या वृक्षाच्या सानिध्यात बरेच रोग दूर होतात आणि शरीर स्वास्थ टिकून राहतं. कदाचित हे लाभ मिळवण्यासाठीच पिंपळाच्या पूजेचं प्रयोजन असावं. धर्माने पिंपळाची पूजा शुभ फलदायी सांगितली आहे मात्र रविवारी पिंपळाला पाणी घालू नये असं शास्त्र सांगतं. यामुळे दारिद्र्य येतं असंही मानतात. पिंपळ कापू नये. ही कृती पितरांना कष्ट देणारी असते. जाणते-अजाणतेपणी ही कृती घडल्यास वंशवृद्धीमध्ये बाधा येते अशीही अनेकांची धारणा दिसते.

जाणून घ्या

## कामेश्वर धाम

भगवान शंकराने तिसरा डोळा उघडून कामदेवाला भस्म केलं होतं. हे घडलं ते स्थान उत्तर प्रदेशमधल्या बलिया जिल्ह्यात असल्याचं मानलं जातं. या स्थानाला कामेश्वर धाम असं म्हणतात. या स्थानाचं वर्णन शिवपुराणातही आढळतं. तसंच कामदेवाने ज्या आंब्याच्या झाडाच्या मागे लपून शंकरावर पुष्पबाण चालवले होते ते झाडही अर्धवट जळलेल्या अवस्थेत या ठिकाणी असल्याचं मानलं जातं. मातलेल्या तारकासुराचा वध करण्याच्या उद्देशाने समाधीस्त झालेल्या शंकराला जागृतावस्थेत आणण्याची जबाबदारी देवांनी कामदेवावर सोपवली होती. त्यामुळे कामदेवाने आंब्याच्या झाडामागे लपून शंकरावर पुष्पबाण चालवले. यामुळे शंकराची समाधी भंग पावली. संतापलेल्या शंकराने मग तांडवनृत्य करून तिसरा डोळा उघडला आणि कामदेवाला भस्म केलं. हे स्थान अत्यंत पवित्र मानलं जातं. अनेक साधूंनी, संतजनांनी कामेश्वर धामला भेट दिली आहे. त्रेतायुगात महर्षी विश्वामित्रांसह राम आणि लक्ष्मण इथे आले होते असं म्हणतात. दुर्वासमुनींनीही या स्थानी तप केला होता. इतरही अनेक महान ऋषी आणि संतसज्जनांनी या स्थानी तप केले आहेत. त्यामुळे या स्थानाला विशेष महत्त्व प्राप्त झालं आहे. या ठिकाणी भगवान शंकर आणि कामदेवाच्या दगडात घडवलेल्या मूर्तीही आहेत.

तीर्थक्षेत्र

कामेश्वर धाममध्ये तीन प्राचीन शिवलिंगं आहेत. तीन मंदिरांमध्ये या शिवालयाची स्थापना करण्यात आली आहे. रानीपोखराच्या पूर्व किनाऱ्यावर असलेल्या आंब्याच्या झाडाखाली कामेश्वर नाथ शिवालय आहे. या स्थानी असलेलं शिकलिंग स्वयंभू असून ते खोदकामादरम्यान सापडलं होतं. श्री कमलेश्वरनाथ शिवालयाची स्थापना अयोध्येचा तत्कालीन राजा कमलेश्वरने केली होती. या ठिकाणी आल्यानंतर त्यांचा कुष्ठरोग बरा झाला होता, असं म्हणतात. या शिवालयाच्या जवळ त्यांनी तलावाची निर्मिती केली होती. रानी पोखरा असं या तलावाचं नाव आहे. बालेश्वरनाथ हे स्थान अत्यंत चमत्कारिक असल्याचं मानलं जातं. याबाबत एक आख्यायिका सांगितली जाते ती अशी की १७२८ मध्ये अवधचा नवाब मोहंमद शाहने कामेश्वर धामवर हल्ला केला होता. त्यावेळी या शिवलिंगातून हजारो भुंगे बाहेर आले आणि शाहला पळता भुई थोडी झाली. त्यामुळे या शिवलिंगाचं महत्त्व वादातीत आहे.



# सरपंचाची वृद्धाला मारहाण



■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. १० :

भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील पालांदूर पोलीस ठाणे हद्दीतील मौजा-ढिवरखेडा येथील रहिवासी व गोंदी येथील गटग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच गणेश खुशाल हत्तिमारे यांनी लाथा बुक्क्यांनी गोंदी येथील एका ८० वर्षीय वयोवृद्धाला जबर मारहाण करत गंभीर जखमी केल्याचा आरोप आहे. ही घटना बुधवार, ६ जुलै रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास घडली.

पीडित वृद्धाचे नाव श्रावण सखाराम कांबळे असे असून, त्यांची शेतजमीन ढिवरखेडा शिवारात आहे. ही जमीन सन २०२३ मध्ये ग्रामपंचायतीने ठराव घेऊन अतिक्रमणमुक्त केली होती. दरम्यान, सरपंच हत्तीमारे अधूनमधून त्या जागेवर जात असत. बुधवारी, ६ जुलै रोजी सकाळी कांबळे हे याच जागेवर गेले असता, हत्तीमारे यांनी "तू इकडे का आलास?" असे विचारत त्यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीत कांबळे जमिनीवर पडले, ज्यामुळे त्यांच्या उजव्या मांडीला गंभीर दुखापत झाली. हत्तीमारे यांनी त्यांना पुन्हा मारण्याची धमकीही दिली, असे कांबळे यांनी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार समोर आले आहे.

या प्रकरणी कांबळे यांनी पालांदूर पोलिसांकडे तोंडी फिर्याद दिली. पोलिसांनी सदर गुन्हा अदखलपात्र स्वरूपाचा असल्याचे नमूद करत विविध कलमान्वये नोंद घेतली आहे.

पुढील तपास सहायक फौजदार गायधने करत आहेत. हे प्रकरण राजकीयदृष्ट्याही संवेदनशील बनले आहे, कारण आरोपी गणेश हत्तीमारे हे लाखनी तालुक्यातील पालांदूर मंडळ भाजप युवा मोचार्चा अध्यक्ष असून त्यांची स्थानिक व जिल्हा तसेच राज्यस्तरावरच्या राजकीय घडामोडींचे समन्वयक म्हणून नियुक्ती केली गेली आहे.

# विशाल राईसमिलचा गडचिरोली येथे निकृष्ठ तांदुळ सापडला

## गडचिरोलीच्या शासकीय गोदामात गोदाम व्यवस्थापकाचा तांदूळ स्वीकृत करण्यास नकार, कारवाई कधी होणार?

■ महासागर प्रतिनिधी
देसाईगंज, दि. १० :

गडचिरोली जिल्ह्याच्या देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मधुन स्वीकृत करण्यात आलेला मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ गडचिरोली जिल्ह्यातील तब्बल तीन शासकीय गोडाऊन मध्ये स्वीकृत न करता परत करण्यात आल्याची घटना ताजी असतांनाच गडचिरोलीच्या शासकीय गोदामातही देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मधुन विशाल राईसमिलचा निकृष्ठ तांदूळ आढळून आला आहे.यामुळे एकुणच आकाश अग्रवाल गोडाऊन मधुन मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा वारंवार पुरवठा केल्या जात असल्याचे गडचिरोली येथील गोदाम व्यवस्थापकाने आढळून आलेला तांदुळ स्वीकृत करण्यास नकार दिल्याने आकाश अग्रवाल गोडाऊन मध्ये निकृष्ठ तांदूळ स्वीकृत करून कर्तव्यात कसूर करणाऱ्या गुणनियंत्रण अधिकारी व त्याचेवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेले निरिक्षण अधिकारी हे दोषी असल्याने त्यांना तात्काळ निलंबित करून निकृष्ठ तांदळाचा



पुरवठा करणाऱ्या मिलरवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली असल्याने संबंधित विभागात एकच खळबळ माजली आहे.

प्राप्त माहितीनुसार देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मधुन विशाल राईसमिलचे संचालक पुरुषोत्तम डेंगानी यांचा मानवी खाण्यास अयोग्य सिएमआर तांदुळ येथील गुणनियंत्रण अधिकारी व निरिक्षण अधिकारी यांनी संगनमताने कोणतीही गुणवत्ता तपासणी न करता गडचिरोली येथील शासकीय गोदामात दि.३१ जुलै २०२५ रोजी सार्वजनिक वितरणाकरीता गडचिरोली येथील अनुराग ट्रान्स्पोर्ट कंपनीच्या एमएच-34 एम-6133 या क्रमांकाच्या वाहनाने तब्बल 450 कट्टे सिएमआर तांदुळ आकाश अग्रवाल गोडाऊन देसाईगंज(वडसा) येथुन गडचिरोली येथील शासकीय गोदामात पाठवला होता.सदर तांदुळ विशाल राईसमिल कुरुडचे संचालक पुरुषोत्तम डेंगानी यांच्या मिलमध्ये भरडाई करून आकाश अग्रवाल गोडाऊन देसाईगंज येथे गुणवत्ता तपासणी करीता पाठविण्यात आल्याचे भासविण्यात आले.वास्तवात सदर तांदळाची कोणतीच गुणवत्ता तपासणी न करता मानवी खाण्यास अयोग्य तांदुळ पाठविण्यात आल्याचे गडचिरोलीच्या शासकीय गोदामातील गोदाम व्यवस्थापक नरेन्द्र खोब्रागडे याने सदर तांदुळ मानवी खाण्यास अयोग्य असल्याचे सबब पुढे करून सदर तांदूळच गोदामात उतरवून स्वीकृत करण्यास नकार देत आकाश अग्रवाल गोडाऊन व विशाल राईसमिल यांना तब्बल 450 कट्टे तांदुळ बदलून देण्यासंदर्भात पत्र दिले.

वास्तवात देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मधुन विशाल राईसमिल कुरुडचा तांदुळ येथील गुणनियंत्रण अधिकारी व निरिक्षण अधिकारी यांनी सदर तांदळाची गुणवत्ता तपासणी करूनच गडचिरोली येथील शासकीय गोदामात सार्वजनिक वितरणाकरीता पाठवणे आवश्यक होते.मात्र येथील जबाबदार अधिकाऱ्यांनी सदर तांदळाची कोणतीच गुणवत्ता तपासणी न करता गडचिरोली येथील शासकीय गोदामात पाठवल्याचे यामुळे स्पष्ट होते.असे असल्याने गडचिरोली येथील शासकीय गोदाम व्यवस्थापक नरेंद्र खोब्रागडे याने सदर तांदुळ जप्त करून व तसा वरिष्ठ अधिकाऱ्यांना अहवाल सादर करून सदर तांदळाचा पंचनामा करणे अपेक्षित होते.तसेच मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा करणाऱ्या विशाल राईसमिलचे संचालक पुरुषोत्तम डेंगानी यांचेवर जीवनावश्यक वस्तु अधिनियमांतर्गत व पुरवठा करण्यात आलेल्या तांदळाची कोणतीही गुणवत्ता तपासणी न करता तांदुळ स्वीकृत करणाऱ्या आकाश अग्रवाल गोडाऊन देसाईगंज येथील गुणनियंत्रण अधिकारी व निरिक्षण अधिकारी यांचेवर कायदेशीर कारवाई होणेस्तव आवश्यक कारवाई करणे अपेक्षित होते.

दरम्यान गडचिरोली येथील शासकीय गोदामात कर्तव्यावर असलेल्या गोदाम व्यवस्थापक नरेंद्र खोब्रागडे यांनीही असे न करता पाठवलेल्या तांदळाचे वाहान खाली करून नियमानुसार स्वीकृत केलेला तांदूळ बदलून न मागता कायदेशीर कारवाई करणे आवश्यक असतांना कर्तव्यात कसूर करून संबंधितांना लाभ पोहचवण्याचा प्रयत्न केला असल्याचे यावरून दिसून येते.एकुणच घडामोडींवरून संगनमताने मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा करून आर्थिक लाभ पोहचवणे हा उद्देश असल्याचे स्पष्ट होत असल्याने या गंभीर तेवढ्याच धक्कादायक प्रकरणाची सखोल चौकशी करून या प्रकरणात दोषी असलेल्या सर्वांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.याबाबत संबंधित विभागाचे अधिकारी काय कारवाई करतात याकडे येथील नागरीकांचे लक्ष लागून आहे.

# नितीन गडकरींच्या जनसंपर्कात निवेदनांचा पाऊस

## ज्येष्ठांकडून सरकारी योजनांच्या लाभासाठी, दिव्यांगांकडून कृत्रिम अवयवांसाठी अर्ज

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यक्रमात निवेदनांचा अक्षरशः पाऊस पडला. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग तसेच महिलांनी विविध कामांसाठी नितीन गडकरी यांना निवेदनं दिली.

खामला चौकातील जनसंपर्क कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास यांसह विविध सरकारी विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. नितीन गडकरी यांनी अधिकाऱ्यांना निवेदनांवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. भूमि अभिलेख, समाजकल्याण विभाग, सीआरसी सेंटर, नगर भूमापन अधिकारी, सेतू, पोलीस विभाग, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, मुख्यमंत्री सहायता कक्ष, महावितरण आदी विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. या विभागांशी संबंधित निवेदनं गडकरी यांनी तत्काळ संबंधित





अधिकाऱ्यांना सुपूर्द केली.

याशिवाय, दिव्यांगांना केंद्र व राज्य सरकारच्या योजनांमधून कृत्रिम अवयव देण्यासंबंधीही त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या संदर्भात आलेली निवेदनं उपस्थित अधिकाऱ्यांकडे देऊन रुग्णांना तातडीने मदत करण्याचे निर्देश नितीन गडकरी यांनी दिले.

काही तरुणांनी नितीन गडकरी यांची भेट घेऊन ट्रायसिकलचे प्रेझेंटेशन दिले. बॅटरीवर चालणाऱ्या या ट्रायसिकलचे बटण दाबताच ते व्हिलचेअरमध्ये रूपांतरित होते. फूड डिलिव्हरीसाठीही अनेक दिव्यांग या ट्रायसिकलचा वापर करत आहेत. ना. नितीन गडकरी यांनी या तरुणांचे कौतुक करून त्यांना पुढील कार्यवाहीसंदर्भात मार्गदर्शन केले.

मूळचे अकोल्याचे निळकंठ पाठक गेल्या दोन दशकांपासून शेती आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी काम करत आहेत. त्यांनी नितीन गडकरींपुढे कृषी सेना ही कल्पना मांडली.

भारताला स्थलसेना, वायूसेना, जलसेनेच्या धर्तीवर कृषी सेनेचीही आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. शेतीमध्ये येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी कौशल्य असलेली माणसं व मजूर मिळत नाहीत. भारत कृषीप्रधान देश असल्यामुळे देशातील मातीची व जमिनीची रक्षा करणारी सेना असण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. नितीन गडकरी यांनी या संकल्पनेचे कौतुक केले.

### ८४ वर्षांचे आजोबा म्हणाले, मी रोज १४ किलोमीटर चालतो

दररोज १४ किलोमीटर पायी चालणारे ८४ वर्षीय बलदेव चावला यांनी देखील मंत्री महोदयांची भेट घेतली. नितीन गडकरी यांनी चावला यांची दिनचर्या ऐकून त्यांचे कौतुक केले. चावला यांनी यापूर्वी एकाच दिवशी सलग २२ तसेच ४२ किलोमीटर चालण्याचा उपक्रम राबविला आहे, हे विशेष. मंत्री महोदयांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# कोराडी मंदिराचे गेट कोसळले

## १७ कामगार जखमी असल्याची माहिती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

नागपूर जिल्ह्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. नागपुरातील कोराडी येथील श्री जगदंबा महालक्ष्मी मंदिराचा मागच्या बाजूला महाद्वाराचे बांधकाम सुरू होते. यादरम्यान महाद्वाराचा स्लॅब कोसळल्याची घटना घटना घडली आहे. या दुर्घटनेत १७ कामगार जखमी झाल्याची माहिती आहे. तसेच, जखमींची आकडेवारी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या दुर्घटनेत या ढिगाऱ्याखाली अनेकजण दबले गेल्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच, काही जखमी असल्याचेही सांगण्यात येत आहे. तर जखमींवर छिंदवाडा रोडवरील मॅक्स आणि नंदिनी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, या घटनेत १७ कामगार जखमी झाले आहेत. जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल केले असून त्यांच्या उपचार सुरू आहेत. महाद्वाराच्या छताचा भाग कोसळल्याचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. मंदिर समितीने या बाबतीत अजून कुठलेही अधिकृत निवेदन सादर केलेले नाही.

खापरखेडा येथून कोराडी मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावर या प्रवेशद्वाराचे काम सुरू होते. घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी डॉ. विपीन ईटनकर व पोलिस उपायुक्त निकेतन कदम यांनी घटनास्थळी भेट देऊन माहिती घेतली. मंदिर समितीने या बाबतीत अजून कुठलेही अधिकृत निवेदन सादर केले नसले तरी एनडीआरएफ मदत कार्य सुरू आहे. सध्या कुठल्याही प्रकारची कॅज्युएल्टी नाही. मलबा हटवण्याचे काम सुरू आहे, असे पोलिस उपायुक्त निकेतन कदम यांनी सांगितले.

नागपूरचे पालकमंत्री चंद्रकांत बावनकुळे हे स्वतः या मंदिराचे अध्यक्ष आहेत. बावनकुळे प्रशासनाच्या संपर्कात असून घटनेचे अपडेट घेत आहेत. बावनकुळे यांनी प्रशासनाला तात्काळ मदतकार्य सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले- पोलिस गर्दीवर नियंत्रण मिळवण्याचे काम करत आहेत. जखमींना रुग्णालयात नेण्यात आले आहे. गेटखाली अजून कुणी दाबल्या गेलं आहे का? याची खात्री पोलिसांकडून केली जात आहे. तसेच, या ठिकाणची परिस्थिती सध्या नियंत्रणात आहे.



### कुठल्याही प्रकारची कॅज्युएल्टी नाही- पोलिस उपायुक्त

पोलिस उपायुक्त निकेतन कदम म्हणाले की, एनडीआरएफची टीम घटनास्थळी दाखल झाली असून मदतकार्य राबवण्यात येत आहे. सध्या कुठल्याही प्रकारची कॅज्युएल्टी नसल्याचीही माहिती आहे. तर, मलबा हटवण्याचे काम सुरू असल्याची माहिती कदम यांनी दिली. मदतकार्यही वेगाने सुरू असून मलबा हटवला जात आहे.

### जिल्हाधिकारी डॉक्टर विपिन इटनकर काय म्हणाले?

या घटनेबाबत बोलताना नागपूरचे जिल्हाधिकारी डॉक्टर विपिन इटनकर म्हणाले- गेटचं काम सुरू असताना ही दुर्घटना घडली. यामध्ये काही मजूर अडकले होते. त्यांना किरकोळ दुखापत झाली असून या सर्वांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यात कोणीही गंभीर जखमी झालेले नाही. या घटनेनंतर आम्हाला पालकमंत्र्यांचा फोन आला होता, त्यानुसार आम्ही काम करत आहोत. आता गेटखाली कोणीही नाही, अशी अपेक्षा आहे.

# आताच मतदार यादीवर आक्षेप नोंदवा

## भाजपा, महायुती ५१ टक्के मतांनी जिंकणार : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १० :

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे सध्या खोटे बोला, रेटून बोला हेच काम सुरू आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेमध्ये प्रत्येक पक्षाचे बुथ पातळीवरील एजंट असतात. जेंव्हा तुम्हाला मतदार यादीवर आक्षेप घेण्याची वेळ होती, तेंव्हा तुम्ही ते घेतले नाहीत. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महाविकास आघाडी भूईसपाट होणार आहे.



आजही संधी आहे. आता मतदार याद्या पाहण्याची वेळ आली आहे. आताच मतदार यादी पुन्हा बघून घ्या, आताच आक्षेप घेऊन टाका, नाहीतर निवडणूक हरल्यावर पुन्हा म्हणतील की मतदार यादी चुकीची होती, अशी टीका महसूल मंत्री आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी येथे पत्रकारांशी बोलताना केली.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, काँग्रेसचे नेते आता खोटे बोलत आहे. बाळासाहेब थोरात निवडणूक हरले, त्यांनी आक्षेप नोंदवला नाही. नाना पटोले फक्त दोनशे मतांनी जिंकले, त्यांनीही आक्षेप घेतला नाही. पूर्ण निवडणूक प्रक्रिया आटोपली, तुमचे आक्षेप नाहीत. आपल्या राज्यात एक लाख बुथ आहे. यापैकी कोणत्या एका तरी बुथवर काँग्रेसच्या नेत्यांनी आक्षेप घेतला का, मतदान झाल्यानंतर जेंव्हा मतदान यंत्रे सील केली जातात, तेंव्हा कुणी आक्षेप नोंदवले का, एक लाख बुथवरील मतदान प्रक्रियेवर आक्षेप घेतले का, आता निवडणुका झाल्यानंतर तुम्ही निवडणूक हरले.

आताही निवडणुकीत पराभूत झाल्यावर काय सांगतील की मतदार यादीत गडबड होणार आहे. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या वेळी २ कोटी ५० लाख मते मिळाली, ३१ खासदार जिंकले, तेव्हा मतदार यादी बरोबर होती. तेंव्हा मतदान यंत्रे बरोबर होती आणि भाजप जिंकली, तर यंत्रे खराब झाली. मतदार यादी खराब झाली, हे उद्योग थांबले पाहिजेत. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महाविकास आघाडी भूईसपाट होणार आहे.

भाजपा, महायुती ५१ टक्के मतांनी जिंकणार आहे. आजही महाविकास आघाडीच्या नेत्यांना संधी आहे. पुढे म्हणतील की मतदार याद्या चुकल्या. निवडणुकीच्या आधी आताच मतदार यादी पाहून घ्या. आताच आक्षेप घेऊन टाका.

नाहीतर उद्या पराभूत झाल्यावर पुन्हा मतदार यादी चुकीची होती, असे म्हणतील. काँग्रेसच्या नेत्या यशोमती ठाकूर या आरोप करताहेत, त्यांनी आताच आक्षेप नोंदवावेत.

# एसीपींसह वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :

मुंबई पोलीस दलात मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. पदोन्नती मिळालेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षकांना पोस्टिंग देण्यात आले असून शनिवारी अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. त्याचसोबत ज्येष्ठतेनुसार पोलीस निरीक्षकांची रिक्त झालेल्या पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून बदली दाखविण्यात आली. ऐन गणेशोत्सवाच्या तोंडावर मुंबई पोलीस दलात मोठे फेरबदल करण्यात आले आहेत.

# लाडकी बहीण योजना ५ वर्षे सुरूच राहणार : मुख्यमंत्री

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १० :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रक्षाबंधननिमित्त महिलांना मोठे आश्वासन दिले आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना पुढील पाच वर्षे सुरूच राहणार आहे. सध्या मिळणाऱ्या मानधनात आणखी वाढ केली जाईल, अशी घोषणा त्यांनी केली. मुलुंड येथे आयोजित रक्षाबंधन कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले. या वेळी फडणवीस यांनी महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली.



योजना सुरू करत असताना अनेकांनी विरोध केला आणि कोर्टात गेले. मात्र, लाडक्या बहिणींनी अनेक सावत्र भावांचे मनसुबे उधळले, असा टोला फडणवीस यांनी लगावला. सध्या योजनेचा लाभ अडीच कोटी महिला घेत आहेत. काही भावांनी बहिणींच्या नावानेच पैसे घेणे सुरू केले. काहींनी पुरुष आहे हे लक्षात येईल म्हणून मोटारसायकलचा फोटो लावला. असे सगळे शोधून काढले असून त्यांचे पैसे थांबवले आहेत. मात्र, अशा प्रत्येकाची पडताळणी करा, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. पात्र महिलांना त्यांचा लाभ मिळाला पाहिजे. मात्र, घुसखोरांना बाहेर काढा, अशा सूचना दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणांची प्रशंसा करत फडणवीस यांनी महिलांना अर्थव्यवस्थेचे दुसरे चाक म्हटले. बेटी बचाओ, बेटी पढाओपासून सुरू झालेला प्रवास लखपती दीदीपर्यंत पोहोचला आहे. राज्यात २५ लाख लखपती दीदी तयार झाल्या असून एक कोटी महिलांना लखपती बनवण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रात महिला बचत गटांसाठी उमेद मॉल उभारले जाणार असून पहिल्या टप्प्यात १० मॉल सुरू होतील. महायुती सरकारने राज्यात केजी ते पीजीपर्यंत शिक्षण मोफत केले आहे. यामुळे आता महाराष्ट्रातील महिला थांबणार नाहीत. महिला थांबल्या नाहीत तर राज्याचा विकासही थांबणार नाही.

# महावितरणचे विद्युत सुरक्षा अभियान देशात आदर्श

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १० :

### केंद्रीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांच्याकडून कौतुक

९ ऑगस्ट २०२५: महावितरणच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून राज्यभरात विद्युत सुरक्षा अभियान राबविण्यात आले. या उपक्रमाचे केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी कौतुक केले आहे. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना पत्र पाठवून शून्य विद्युत अपघात उदि्दष्टाच्या जनजागृतीसाठी हे अभियान देशासाठी एक आदर्श आहे असे त्यांनी गौरवोद्गार काढले.

विद्युत सुरक्षेबाबत राज्यभरात जनजागृती करण्यासाठी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या सूचनेनुसार महावितरणच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त प्रकाशमान महाराष्ट्र, सुरक्षित महाराष्ट्र या विद्युत सुरक्षा अभियानाला सुरवात करण्यात आली. मानव संसाधन विभागाचे संचालक राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक परेश भागवत यांच्या नियोजनातून दि. १ ते ६ जून दरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांत तब्बल २ लाख ११ हजारांवर नागरिक, शालेय विद्यार्थी, अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. यासह महावितरणकडून मोबाईल एसएमएसद्वारे १ कोटी ९३ लाख आणि ई-मेलद्वारे ३५ लाख ७३ हजार वीजग्राहकांना विद्युत सुरक्षेबाबत संदेश पाठविण्यात आले.

आजवरच्या सर्वाधिक लोकसहभागाच्या विद्युत सुरक्षा अभियानाची खास दखल घेत केंद्रीय नवीन व नवकरणीय राज्यमंत्री ना. श्रीपाद नाईक यांनी पत्राद्वारे कौतुक केले आहे. महावितरणने शून्य विद्युत अपघाताच्या उदिदष्टासाठी सुरू केलेल्या जनजागृती अभियानाचे केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय मंत्रालयाच्या वतीने कौतुक करतो. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने हे अभियान राबवविले आहे. त्यातून प्रत्यक्ष लोकसहभाग व डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे विद्युत सुरक्षेबाबत प्रभावी प्रबोधन व जनजागरण करण्यात आले. महावितरणचे सर्व संचालक, क्षेत्रीय अभियंते, अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिकांनी दिलेले योगदान शून्य विद्युत अपघाताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अत्यंत महत्वाचे आहे. त्यांची या अभियानामुळे विद्युत सुरक्षेसाठी असलेली बांधिलकी दिसून येते.

# जुन्या एमआयडीसीतील एअर कार्गो ट्रान्सपोर्टला भीषण आग

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १० :

अमरावती जुन्या बायपास रोडवरील जुन्या एमआयडीसीतील एअर कार्गो गती ट्रान्सपोर्टला शनिवारी ९ रोजी पहाटे ४ वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत कुरियरचे साहित्य, इलेक्ट्रिक साहित्य, दुचाकी व आटो पार्टस असे लाखो रुपयाचे साहित्य जळून खाक झाल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मात्र नेमकी किती रुपयाची हानी झाली याबाबत माहिती कळू शकली नाही. तसेच आगीचे कारणही अज्ञात आहे. आगीची माहिती मिळताच घटनास्थळी तत्काळ अग्निशमन बंब रवाना करण्यात आले.

# फुटबॉलच्या वादातून गोळीबार; एक जखमी

■ महासागर प्रतिनिधी
पुसद, दि. १० :

वसंतनगरच्या चौथ्या गल्लीमध्ये फुटबॉल खेळण्याच्या कारणावरून तुफान गोळीबार झाल्याने परिसर हादरून गेला आहे. परिसरात गोळीबार झाल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. गोळीबारमध्ये एक जण गंभीर जखमी झाला आहे. ही घटना शुक्रवारी दि. ८ ऑगस्टला रात्री १०.३० वाजताच्या दरम्यान घडली होती. वसंत नगर पोलिसांनी एका संशयिताला ताब्यात घेतले असून परिसरात तणावपूर्ण शांतता पसरली आहे. तर गोळीबारात अजिज खान फतेह खान (वय ५२) वर्ष रा.वसंत नगर हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमीचा मुलगा हसन खान अजिज खान (वय ३५) वर्ष रा. निसार टेलर मार्ग गल्ली क्रमांक पाच (वसंत नगर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून मुलतानवाडी तांडा येथे राहणाऱ्या शेख साहिल शेख वजीर (वय २४) वर्ष, मोमीनपुरा (मुलतानवाडी) येथे राहणाऱ्या रियाज उर्फ रम्मू अहमद पठाण (वय २८) वर्ष, बेंडकीपुरा वसंत नगरात राहणाऱ्या मोहम्मद आवेश उर्फ टिंडा मो. नजीर (वय २७) वर्ष व सहारा पार्क येथे राहणाऱ्या जुनेद शेख रफिक शेख (वय २४) वर्ष यांच्या विरोधात वसंत नगर पोलिस ठाण्यामध्ये मध्यरात्री विविध कलमान्वये गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, हसन खान यांचा मावस भाऊ व शेख साहिल यांच्यामध्ये फुटबॉल खेळण्याच्या कारणावरून वाद निर्माण झाला होता. त्यानंतर दोघात तुफान भांडण झाले होते. अशातच शेख साहिल याने त्याच्या तीन साथीदारांसोबत संगणमत करून हसन खान यांच्या घरासमोर येऊन बंदुकीने काही गोळ्या हवेत झाडण्यास सुरूवात केली. त्याच वेळी अजीज खान हे समोर दिसल्याने त्यातील एक गोळी त्यांना लागली.